नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक २३ * * चंद्रपूर * बुधवार, दिनांक २३ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## जेके, हिमाचल प्रदेशात भूस्खलन, ५ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :
जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात पाऊस आणि भूस्खलनामुळे ५ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका ५ वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे. भूस्खलनाच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये अनेक लोक जखमीही झाले आहेत. जम्मूतील रियासी येथील वैष्णोदेवी मंदिरात जाताना झालेल्या भूस्खलनात एका ७० वर्षीय यात्रेकरूचा मृत्यू झाला तर ९ जण जखमी झाले. दरम्यान, हिमाचलमधील चंबा येथे घरावर दगड कोसळून एका नवविवाहित जोडप्याचा मृत्यू झाला. राज्यातील ४०१ रस्ते बंद आहेत. मध्य प्रदेशातील मांडला जिल्ह्यातील कान्हा व्याघ्र प्रकल्पातील एक वाघ पुरात वाहून गेला. महाराष्ट्रातही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

## कोकाटे : पराचा कावळा

आपले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी रमी प्रकरणाबद्दल खुलासा करताना आज मोकळेपणाने आपला उद्वेग प्रकट केला. आजकाल आपल्याला लहानसहान गोष्टींना मोठेमोठे फाटे फोडून जणूकाही आभाळच कोसळले आहे अशा पद्धतीने बोंबा मारण्याची सवय झालेली आहे. यामध्ये राजकारणी आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत, पत्रकार आहेत आणि अनेक तथाकथित विद्वान लोकसुद्धा आहेत. माणिकराव कोकाटे यांच्याशी जराही चर्चा न करता कुणीतरी माणिकराव कोकाटे यांचा व्हिडिओ काढला आणि माणिकराव रमी खेळत होते असे जाहीर करून टाकले. आमच्या पत्रकारांना चटपटीत बातमी मिळाली की मग सगळ्या वाहिन्या, वृत्तपत्रे आणि सर्वच समाज माध्यमे हल्लाबोल करून आकाशपाताळ एक करतात. त्यामुळेच माणिकरावांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केली गेली. त्यांनी केलेल्या कथित गुन्ह्यांची यादी देऊन हा कितव्या क्रमांकाचा गुन्हा आहे याचीही जंत्रीच मांडली गेली. आता माणिकराव कोकाटे यांनी खुलासा करून आपण मुळात रमी खेळतच नव्हतो तर त्या खेळाची जाहिरात मोबाईलवर आली होती. ती बदलून दुसऱ्या हाऊसचे कामकाज पाहण्याचा प्रयत्न करीत असताना १५ ते २० सेकंदाचा व्हिडिओ काढून कोणीतरी गदारोळ उडवून दिला आहे हे स्पष्ट केले. माणिकराव कोकाटे यांच्या मनात शेतक?यांबद्दल जिव्हाळा आहे त्याची प्रचिती अनेकदा आली आहे. पण शेतकरी अडचणीत असताना माणिकराव रमी खेळत होते, असा खोटा गाजावाजा करून त्यांची जी बदनामी केली आहे त्याबद्दल आपण न्यायालयात जाऊ असेही ते म्हणाले. जी गोष्ट झालीच नाही त्या गोष्टीचे भांडवल करणाऱ्यां विरुद्ध आपला आक्रोश त्यांनी मनापासून व्यक्त केला आहे. तसेच बदनामी करणाऱ्यांच्या विरुद्ध दंड थोपटले आहेत. आपण थोड्याशा अवधीत बोगस पीक विमा काढणाऱ्या पाच ते साडेपाच लाख बोगस अर्जांना रद्द केले. याच थोड्याशा कालावधीत ५२ जीआर काढले, आजपर्यंत महाराष्ट्राच्या कृषी संशोधन केंद्रांवर एकही कृषिमंत्री गेला नव्हता. आपण बऱ्याचशा कृषी संशोधन केंद्रांवर जाऊन त्यांना मदत केली, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. हवामानाबाबत जी काही भाकीते वर्तवली जातात ती राज्यात, विभागात जिल्ह्यात किंवा तालुक्याबाबत असतात. मात्र आपल्याला प्रत्येक गावात हवामान केंद्र असावे असे वाटत असल्याचे त्यांनी बोलूनही दाखवले. एवढे करूनही आपण शेती म्हणजेच कृषी खात्याचे काम न करता रमी खेळतो, असे बिन बुडाचे आरोप झाल्यावर कोणालाही वाईट वाटणे स्वाभाविकच आहे, तसेच माणिक रावांनाही वाटलेले असेल. मुद्दा असा आहे की लहानसहान गोष्टींबाबत पराचा कावळा करण्यासाठी सध्या जणूकाही अहमहमिकाच लागलेली आहे. बुलढाण्याचे आमदार गायकवाड यांनी आमदार निवासातील भोजनालय कर्मचाऱ्याला मारहाण केली ही बातमी मोठ्या प्रमाणात प्रसारित होते. त्या मागची पार्श्वभूमी आणि कारणे कोणती आहेत याच्या मुळाशी कोणी जातच नाही. तुम्ही शिळे आणि वास मारणारे अन्न खायला द्याल आणि वारंवार तक्रार करूनही दखल घेणार नाही. त्यावेळी त्या गोष्टींबाबत उद्रेक झाल्यावर त्याचेच भांडवल करणार आणि दोष देत सुटणार असे सध्या सुरू आहे. बऱ्याच वेळा माणिकराव कोकाटे त्यांच्या सरळसोट स्वभावानुसार अनेक गोष्टी बोलतात. ते जे बोलतात त्यामागील खरी पार्श्वभूमी किंवा मनीषा जाणून न घेता नेमकी त्याबाबत किंवा इतर कोणत्याही विधानावरून कोकाटेंची बदनामी करण्याचे षडयंत्र महाराष्ट्रात सुरू केले गेले आहे की काय असेही वाटू लागले आहे. आज खुलासा करताना माणिकरावांनी स्पष्ट सांगितले की, शेतकरी भिकार नाही शासनच भिकार आहे. आता त्यांच्या या विधानाचीही चिरफाड केली जाईल आणि हा त्यांचा कितवा गुन्हा आहे सांगून त्यांच्यावर आसूड ओढले जातील. माणिकराव मोकळ्या स्वभावाचे असल्यामुळे जे त्यांच्या मनात असते तेच त्यांच्या जिभेवर येते आणि ती भावना ते पोटात दाबून ठेवत नाहीत कारण त्यांना ढोंगीपणा करता येत नाही हाच त्यांचा दोष आहे. या सरकारला शंभर दिवस झालेले आहेत, या १०० दिवसाच्या कार्यक्रमात कृषी विभाग तिसऱ्या क्रमांकावर आहे हे आवर्जून नमूद केले पाहिजे असेही माणिकरावांनी स्पष्ट केले. एकूणच, उतावळा नवरा डोक्याला भार अशी आजच्या समाजाची स्थिती झालेली आहे. या ठिकाणी आम्हाला एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे, माणिकरावांनी आता कोणताही शब्द उच्चारताना आपल्या मागे पराचा कावळा करणारे सर्व थरातील लोक आहेत, याचा विचार करून आपल्या स्वभावाला मुरड घालावी आणि विनाकारण होणारी बदनामी टाळावी, हा त्यांना एक प्रेमाचा सल्ला आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## गडचिरोलीच्या विकासात जंगलासह

# शहरी नक्षल्यांचा अडसर

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २२ :
जंगलातील नक्षलवाद संपुष्टात येत असताना देशात शहरी नक्षलवादाने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. गडचिरोलीत आजघडीला बोटावर मोजण्याइतपत नक्षल शिल्लक आहे. मात्र, शहरी नक्षलवाद्यांकडून विविध अफवा पसरवून येथील विकासात खोडा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. असा दावा मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

गडचिरोली जिल्ह्याच्या कोनसरी येथे लॉयडस मेटल्स अँड एनर्जी लि. च्या वतीने ४.५ एमटीपीए क्षमतेच्या भव्य एकात्मिक पोलाद प्रकल्प, कोनसरी येथे १०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय, सीबीएसई पद्धतीची शाळेचे भूमिपूजन, सोमनपल्ली येथे कर्मचारी वसाहतीचे उद्घाटन व भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते.

फडणवीस म्हणाले की, गडचिरोलीची नक्षलवादग्रस्त जिल्हा ही ओळख पुसली जात आहे. हा बदल नक्षलवाद्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून संविधान स्वीकारल्यामुळेच शक्य झाला. त्यांमुळे उर्वरित नक्षलवाद्यांनी शस्त्रं खाली ठेवून संविधानाचा स्वीकार करत मुख्य प्रवाहात यावे. बंदुकीचा नक्षलवाद संपत असला तरी शहरी नक्षलवादापासून सावध राहण्याचे आवाहन त्यांनी केले. गडचिरोलीचा विकास सुरू झाला असताना आदिवासींच्या जमिनी हिसकावल्या, मोठ्या प्रमाणात जंगलतोड अशा अफवा पसरविण्यात आल्या. अशा अफवांपासून सावध राहा, कारण त्या लोकांना विकासापासून दूर ठेवण्यासाठी पसरवल्या जात आहेत. यासाठी विदेशातून रसद पुरविल्या जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात गडचिरोलीच्या विकासावर आणि स्टील हब बनवण्याच्या स्वप्नपूर्तीवर विशेष भर दिला. ते म्हणाले की, गडचिरोलीचा चेहरामोहरा बदलविण्याचे काम लॉयड्सच्या माध्यमातून होत आहे. आतापर्यंत १४ हजार स्थानिकांना रोजगार मिळाला आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी राज्याचे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तसेच गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री अँड. आशिष जयस्वाल, पद्मश्री पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्त्या तुलसी मुंडा, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांत बोकारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## २००६ मुंबई बॉम्बस्फोट

## सरकार सुप्रीम कोर्टात



### २४ जुलैला सुनावणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
२००६ च्या मुंबईतील साखळी ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणात महाराष्ट्र सरकारने आता सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. २४ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात तात्काळ सुनावणीसाठी अपील केले होते.

२१ जुलै रोजी, मुंबई उच्च न्यायालयाने २००६ मध्ये मुंबईत झालेल्या साखळी ट्रेन बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने म्हटले की, सरकारी वकील आरोपींविरुद्धचा खटला सिद्ध करण्यात अपयशी ठरले. उच्च न्यायालयाने म्हटले की, आरोपींनी गुन्हा केला आहे यावर विश्वास ठेवणे कठीण आहे, म्हणून त्यांना निर्दोष सोडण्यात येत आहे. जर ते इतर कोणत्याही प्रकरणात नको असतील तर त्यांना तात्काळ तुरुंगातून सोडण्यात यावे.

न्यायालयाच्या आदेशानंतर, सोमवारी संध्याकाळी १२ आरोपींपैकी दोघांना नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सोडण्यात आले. यामध्ये एहतेशाम सिद्दीकी यांचा समावेश आहे, ज्याला २०१५ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणात मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती.

दुसरा आरोपी मोहम्मद अली जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. १२ पैकी एक असलेला नावेद खान हा नागपूर तुरुंगातच राहणार आहे. कारण तो हत्येच्या प्रयत्नाच्या प्रकरणात अंडरट्रायल आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. या स्फोटात १८९ जणांचा मृत्यू झाला होता.

## ...तर मराठी बोलता येईल का?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :
मराठी बोलता येत नाही म्हणून मला कुणी मारहाण केली, तर त्याने मला लगेच घडाघडा मराठी बोलता येईल का? असा खडा सवाल महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी राज्यात सुरू असलेल्या मराठी - अमराठी वादावर भाष्य करताना उपस्थित केला आहे.

त्यांनी यावेळी कोणत्याही राजकीय पक्षाचे वा नेत्याचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख महाराष्ट्रातील विरोधी पक्षांवर विशेषतः ठाकरे बंधूंवर होता हे स्पष्ट आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज महाराष्ट्र नायक या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन झाले. यावेळी त्यांनी भाषेवरून वाद का घालायचा? असा प्रश्न उपस्थित करत या मुद्यावर आपली विस्तृत भूमिका स्पष्ट केली.

## बिहार मतदार यादीच्या वादावरून

## संसदेत विरोधकांचे आंदोलन



### लोकसभा-राज्यसभा बुधवारपर्यंत स्थगित

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २२ :
संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी लोकसभा आणि राज्यसभेत प्रचंड गोंधळ झाला. विरोधी पक्षाच्या खासदारांनी पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर यासारख्या मुद्द्यांवर पंतप्रधानांना उत्तर देण्यास सांगितले आणि सभागृहात चर्चा करण्याची मागणी केली.

बिहारमधील मतदार यादीची छाननी, स्पेशल इंटेसिव रिव्हिजन विरोधातही विरोधकांनी तीव्र निषेध केला. यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज २३ जुलैपर्यंत तहकूब करण्यात आले. लोकसभा आणि राज्यसभेची बैठक बुधवारी सकाळी ११ वाजता पुन्हा होईल.

आज लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. विरोधकांच्या गदारोळात लोकसभेचे कामकाज पुन्हा सुरू झाले पण काही वेळातच दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह अनेक नेत्यांनी मकर द्वार येथील संसद भवनाच्या पायऱ्यांवर उभे राहून बिहार एसआयआरचा निषेध केला. हे थांबवण्याची मागणी विरोधी पक्ष करत आहे.

त्याचप्रमाणे, राज्यसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी बिहारमधील मतदार यादीच्या सुधारणेवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी केली.

विरोधी पक्षांवर हल्लाबोल करताना केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, सरकार चर्चेसाठी तयार आहे, पण विरोधी पक्ष निदर्शने करून सभागृह चालू देत नाही, जनतेचा पैसा वाया घालवत आहेत.

## हरिभाऊ बागडे यांचे नाव

## उपराष्ट्रपती पदासाठी चर्चेत



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२ :
उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणामुळे अचानक राजीनामा दिला आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील एक प्रमुख नेत्याचे नाव उपराष्ट्रपती म्हणून चर्चेत आहे, राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणावरून आपला राजीनामा दिला आहे. संसदेत पावसाळी अधिवेशन चालू असतानाच हा राजीनामा समोर आला, आणि यामुळे उपराष्ट्रपती पदावर पुढे कोण येणार याबाबत चर्चा सुरू झाली आहे. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याने आता नवीन उपराष्ट्रपती कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून यासाठी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू झाली आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि राजस्थानचे राज्यपाल असलेल्या हरिभाऊ बागडेंच्या नावाची उपराष्ट्रपती म्हणून निवड होऊ शकते. ते हे फुलंब्री विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा आमदार राहिले आहेत.

## भारतीय लष्कराला अमेरिकेकडून

## 3 अपाचे हेलिकॉप्टर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :
भारतीय लष्कराला अमेरिकेकडून तीन अपाचे हेलिकॉप्टरची पहिली तुकडी मिळाली. यामुळे सैन्याच्या हल्ल्याच्या आणि ऑपरेशनल क्षमतांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

हे अत्याधुनिक हेलिकॉप्टर अमेरिकेहून अँटोनोव्ह ट्रान्सपोर्ट विमानातून हिंडन एअर बेसवर आले. ते पाकिस्तानच्या पश्चिम सीमेजवळील जोधपूरमध्ये तैनात केले जातील. हे हेलिकॉप्टर सर्व प्रकारच्या हवामानात उड्डाण करू शकतात. भारतीय लष्कराला अपाचे हेलिकॉप्टर मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. हे हेलिकॉप्टर जगातील सर्वोत्तम लढाऊ हेलिकॉप्टरपैकी एक आहेत. भारतीय हवाई दलाकडे आधीच २२ हेवी अटॅक हेलिकॉप्टर आहेत. अपाचे हेलिकॉप्टरना एअर टँक असेही म्हणतात.

## मिग-२१ निवृत्त होणार



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २२ :
भारतीय हवाई दलात (आयएएफ) ६२ वर्षे सेवा दिल्यानंतर, मिग-२१ लढाऊ विमान १९ सप्टेंबर रोजी निवृत्त होईल. चंदीगड एअरबेसवर या लढाऊ विमानाचा निरोप समारंभ आयोजित केला जाईल. त्यानंतर, विमानाच्या सेवा अधिकृतपणे संपतील.

मिग-२१ जेट पहिल्यांदा १९६३ मध्ये भारतीय हवाई दलात समाविष्ट करण्यात आले. ते भारताचे पहिले सुपरसॉनिक जेट होते, म्हणजेच ते ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त वेगाने उडू शकते. या लढाऊ विमानाचे शेवटचे विमान २३ व्या स्क्वॉड्रनचा भाग आहे, ज्याला पँथर्स म्हणूनही ओळखले जाते.

१९६५च्या भारत-पाकिस्तान युद्धात, १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धात, १९९९ च्या कारगिल युद्धात आणि २०१९ च्या बालाकोट हवाई हल्ल्यात मिग-२१ या लढाऊ विमानाने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

आकडेवारीनुसार, ४०० हून अधिक मिग-२१ विमाने कोसळली आहेत. यामध्ये २०० हून अधिक वैमानिकांचा मृत्यू झाला आहे. म्हणूनच या विमानाला 'उडणारी शवपेटी' आणि 'विधवा बनवणारे' असे म्हटले जाते.

ऑक्टोबर २०२३ मध्ये, मिग-२१ लढाऊ विमानाने राजस्थानमधील बाडमेर शहरावरून शेवटचे उड्डाण केले. भारताने एकूण ८५० हून अधिक मिग-२१ लढाऊ विमाने खरेदी केली होती. त्यापैकी सुमारे ६०० एचएएलने स्वदेशी बनावटीची होती. सध्या भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात फक्त ३६ मिग-२१ शिल्लक आहेत.

## दीप्ती शर्माला १० स्थानांचा फायदा

## स्मृती मंधाना अव्वल स्थानावर कायम





■ वृत्तसंस्था, दुबई, दि. २२ :
आयसीसी महिला क्रमवारीत भारत आणि इंग्लंडच्या खेळाडूंना फायदा झाला आहे. भारताची अष्टपैलू दीप्ती शर्माने फलंदाजांच्या क्रमवारीत १० स्थानांची झेप घेतली आहे. तिने पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाबाद ६२ आणि दुसऱ्या सामन्यात ३० धावा केल्या. आता ती २३ व्या स्थानावर पोहोचली आहे.

इंग्लंडच्या सोफिया डंकलीने पहिल्या सामन्यात ८३ धावा केल्या आणि २४ स्थानांनी प्रगती करत ५२ व्या स्थानावर पोहोचली. ॲलिस डेव्हिडसन-रिचर्ड्सनेही ५३ धावा करत ४० स्थानांनी प्रगती करत ११८ व्या स्थानावर पोहोचली.

भारताची स्टार फलंदाज स्मृती मंधानाने मालिकेत २८ आणि ४२ धावा केल्या आणि ७२७ च्या रेटिंगसह फलंदाजी क्रमवारीत तिचे अव्वल स्थान कायम ठेवले. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दीप्ती शर्माने अर्धशतक झळकावून संघाला विजय मिळवून दिला होता.

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दीप्ती शर्माने अर्धशतक झळकावून संघाला विजय मिळवून दिला होता.

### गोलंदाजांच्या यादीत सोफी एक्लेस्टन अव्वल

इंग्लंडची सोफी एक्लेस्टन एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. तिने दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये चार विकेट्स घेतल्या, ज्यामध्ये दुसऱ्या सामन्यात ३/२७ चा आकडा समाविष्ट आहे. तिचे रेटिंग ७७६ पर्यंत वाढले आणि तिने आपले अव्वल स्थान मजबूत केले. इंग्लंडच्या चार्ली डीन आणि भारताच्या स्नेह राणा यांनी प्रत्येकी तीन बळी घेत फिरकी गोलंदाजांचा या मालिकेत दबदबा राहिला. डीनने टॉप १० मध्ये प्रवेश केला आहे आणि तो ९ व्या क्रमांकावर आहे, तर स्नेह राणा २१ व्या स्थानावर पोहोचली आहे.

## राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत येणार बीसीसीआय




### आज सादर होणार संसदेत विधेयक

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २२ :
भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आता राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाच्या कक्षेत येईल. हे विधेयक बुधवारी संसदेत मांडले जाईल.

वृत्तसंस्था पीटीआयने क्रीडा मंत्रालयातील सूत्रांचा हवाला देत म्हटले आहे की, 'जेव्हा हे विधेयक कायदा बनेल, तेव्हा बीसीसीआयला त्याचे पालन करावे लागेल. जसे इतर राष्ट्रीय क्रीडा संघटना देशाच्या कायद्यांचे पालन करतात.'

बीसीसीआय आता ऑलिंपिक चळवळीचा एक भाग बनला आहे. वेळेवर निवडणुका, प्रशासकीय जबाबदारी आणि क्रीडा संघटनांमध्ये खेळाडूंच्या कल्याणासाठी एक मजबूत रचना निर्माण करण्यासाठी हे विधेयक आणले जात आहे. मात्र, सचिवांकडून विरोध केला जात आहे.

## महाराष्ट्राचे सरकारच भिकारी... माणिकराव कोकाटेंचे वादग्रस्त विधान



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :
कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे चांगलेच अडचणीत सापडले आहेत. विरोधकच नाही तर सत्ताधारी पक्षातील आमदारांनी देखील त्यांच्याविषयी नाराजी व्यक्त केली आहे. इतकेच नाही तर स्वतः मुख्यमंत्र्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

मात्र, यावर स्पष्टीकरण देण्यासाठी पत्रकार परिषद बोलावल्यानंतर कोकाटे यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त विधान केले आहे. मी राज्यातील शेतकऱ्यांना भिकारी म्हणालो नव्हतो, तर महाराष्ट्राचे सरकारच भिकारी असल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता पुन्हा एकदा वादंग उठले आहे.

कोकाटे यांनी शेतकऱ्यांच्या एक रुपयात पिक विमा संदर्भात देखील आपण केलेल्या वक्तव्यावरून झालेल्या वादावर स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला. मात्र हे स्पष्टीकरण देत असताना त्यांनी मी शेतकऱ्यांना भिकारी म्हणालो नव्हतो, असे सांगितले. वास्तविक शेतकरी नाही तर शासनच भिकारी असल्याचे म्हटले आहे. शासन शेतकऱ्यांकडून एक रुपया घेतो. त्याचा अर्थ शासनच भिकारी आहे, असे कोकाटे म्हणाले. त्यांच्या वक्तव्यावरून आता वाद वाढला आहे.

### नवा कृषिमंत्री देण्याची मागणी

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील महाविकास आघाडीतील सर्व आमदारांनी आज केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चव्हाण यांची भेट घेऊन माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. इतकेच नाही तर त्यांच्या ऐवजी संवेदनशील आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण असणारा कृषिमंत्री महाराष्ट्राला द्यावा, अशी मागणी देखील या खासदारांनी केली आहे.

## ब्रम्हपुरीत वंजारी रुग्णालयात मोफत शिबिर

**ब्रम्हपुरी, दि. २२ जुलै :** मुंबई हैदराबाद येथील नामांकित रुग्णालयातून अनुभव घेऊन ब्रह्मपुरी शहरात तीन वर्षापासून सेवा देत असलेले आणि ब्रह्मपुरी मध्ये पंधराशे पेक्षा जास्त एनजीओग्राफी, एन्जोप्लास्टी, पेसमेकर, आयसीडी केलेले अनुभवी सीनियर कार्डिओलाजीस्ट हृदयरोग तज्ञ डॉ.शिशिर वंजारी यांनी ब्रह्मपुरी आरमोरी रोडवर असलेल्या वंजारी रुग्णालयात रुग्णांसाठी शनिवार दिनांक १९ जुलै२०२५ रोजी सकाळी १० ते ४ पर्यंत मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शेकडो रुग्णांनी आपली नाव नोंदनी करून मोफत रुग्णसेवेचा लाभ घेतला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे वाढदीवसानिमित्त चिमुर येथे फळ वाटप



**चिमूर, दि. २२ जुलै :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्य चिमुर तालुका भाजपा तर्फे उपजिल्हा रूग्णालय चिमुर येथे रूग्णांना फळ वाटप करण्यात आला. यावेळी माजी संचालक महाराष्ट्र राज्य सह संघमर्या पुणे तथा भाजपा चे जेष्ठ नेते घनश्याम डुकरे, डॉ दिलीप शिवरकर, एकनाथ थुटे, बालू पिसे, सचिन फरकाडे, मनी रॉय, डॉ दीपक दडमल, नितेश दोडके, विलास कोराम, देविदास मोहीनकर, अरून लोहकरे, भारती गोडे, आदि भाजपा चे पदाधिकारी उपस्थित होते.

# चॉकलेटचे आमिष दाखवून बालकावर अत्याचार

## आरोपीवर पास पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**वरोरा, दि. २२ जुलै :** वरोरा शहरातील जुन्या नगर परिषद समोरील गांधी सागर तलावामधील उद्यानात दिनांक २१ जुलै रोजी सायंकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास एका सहा वर्षीय बालकावर नराधमाने अनैसर्गिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली, साहिल सुरेंद्र सुरेंद्र तेलंग, वय २० रा. साई मंगल कार्यालय , बावणे ले आऊट वरोरा असे आरोपीचे नाव आहे.

वरोरा शहरातील गांधी तलाव येथे काही वर्षाआधी रोटरी क्लब द्वारे तलावाच्या मधोमध उद्यानाची निर्मिती करण्यात आली होती त्यानंतर काही महिने हे उद्यान रोटरी क्लबने चालवल्यानंतर नगर परिषदेला हस्तांतर करण्यात आले. नगर परिषदेच्या दुर्लक्षितपणामुळे या तलावातील उद्यानात अनैसर्गिक कृत्य करणारे व्यसनाधीन मुले नागरिक यांचा येथे नेहमीच वावर असतो, काल दिनांक २१ जुलैला रात्री साडेआठ ते एकच्या दरम्यान साई मंगल कार्यालय येथील साहिल सुरेंद्र तेलंग या आरोपीने एका सहा वर्षीय लहान मुलाचे मुलावर अनैसर्गिक कृत्य केले. ही घटना तेथील काही नागरिकांना माहीत होतात नागरिकांनी आरोपीला चांगलाच चोप देत पोलिसांना याची माहिती दिली. पोलीस त्वरीत घटनास्थळी दाखल होत आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीवर बी एन एस १३७ (२), बी एन एस ४, ६पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली.

पोलीस विभागात गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी एका डीबी पथक अशी स्वतंत्र व्यवस्था असते. ती काही महिन्यांपूर्वी विसर्जित केल्या मुळे शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. तेव्हा पोलीस प्रशासनाने यावर त्वरीत उपाय योजना करणे गरजेचे झाले आहे जेणेकरून गुन्हेगारांवर अंकुश ठेवता येईल. ही कारवाई ए पी आय शरद भस्मे, पोलीस उपनिरीक्षक मनोज वासाडे, शरद मस्के, तीरानकर यांनी केली.

**शहरात संतापाची लाट, आरोपीस कडक शिक्षा देण्याची मागणी**

हि घटना उघडकीस येताच वरोरा शहरात संतापाची लाट उसळली आहे. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि बालहक्क संरक्षण समित्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा मिळावी, अशी मागणी केली जात आहे.

# सीडीसीसीच्या अध्यक्षपदी रविंद्र शिंदे तर उपाध्यक्षपदी संजय डोंगरे अविरोध

## वर्षोनुवर्ष काँग्रेसची सत्ता हटविण्यात भाजपाला यश



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २२ जुलै :** चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या(सिडीसीसी) गेल्या सात दशकातील इतिहासात पहिल्यांदा भाजपाने सत्ता मिळविली असून, अध्यक्षपदी रवींद्र शिंदे तर उपाध्यक्षपदी संजय डोंगरे यांची अविरोध निवड झाल्याने वर्षोनुवर्ष काँग्रेसच्या ताब्यातील बँकेवर भाजपाने झेंडा रोवला.

सभेत अध्यक्षपदासाठी रवींद्र शिंदे तर उपाध्यक्षपदासाठी संजय डोंगरे यांचे नामांकन आले.

**शिंदेने भंग केले खा. प्रतिभा धानोरकर यांचे अध्यक्षांचे बनण्याचे स्वप्न**

बँकेच्या निवडणुकीत सुरवातीला ९ संचालक भाजपकडे होते, तर १२ संचालक काँग्रेस कडे होते,असा दावा काँग्रेसने केला होता.यामुळेच अध्यक्षपदाची अपेक्षा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केली होती.परंतु उबाठाचे रवींद्र शिंदे मविआतून बाहेर पडले.त्यामुळे खासदार मॅडमचे अध्यक्षपदाचे स्वप्न भंगले अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

विरोधी गटाकडून दोन्ही पदांसाठी कोणत्याही संचालकांनी नामांकन दाखल केले नसल्याने अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदावर अविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यावेळी केली. यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी बँकेसमोर फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा केला. नवनियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांचा सत्कार मा. सा. कन्नमवार सभागृहात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मागासवर्गीय आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर, आ. कीर्तिकुमार भांगडिया, आ. किशोर जोरगेवार, आ. करण देवतळे, माजी मंत्री रमेशकुमार गजभे, माजी आ. तथा संचालक सुदर्शन निमकर, माजी आ. संजय धोटे, भाजपाचे महानगरअध्यक्ष सुभाष कासनगोट्टुवार उपस्थित होते.

**एसआयटी चौकशीला लागणार का ब्रेक..?**

काही महिन्यांपूर्वी बँकेतील नोकर भरती प्रकरण चांगलेच गाजले.कोट्यवधींच्या घोटाळ्याचे आरोप त्यावेळी झाल्याने,अनेक नेत्यांनी चौकशीची मागणी केली. प्रकरण सरकार समोर गेल्यावर मधातच निवडणूक आली.८ जुलैला चौकशीसाठी एसआयटी गठीत करण्यात आली.आता देशात,राज्यात व बँकेत भाजपची सत्ता आहे,अश्या स्थितीत एसआयटी चौकशीला ब्रेक लागणार की काय..?असा प्रश्न नोकर भरतीतील उमेदवारांसह नागरिकांना पडला आहे.

# २ वर्षाची पगारवाढ द्या अन्यथा धान्याचे पोते उचलने बंद

## माथाडी कामगार प्रतिनिधि सपन मंडलचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २२ जुलै :** महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ पडोली येथे सुमारे ५० कामगार धान्याचे पोते लोडींग अनलोडींग चे काम गेल्या काही वर्षापासुन करत आहे. गेल्या २ वर्षांपासून कंत्राटदाराने महामंडळाने ठरवलेली पगारवाढ माथाडी कामगारांना दिली नसल्याने कामगारांना आर्थिक आणि शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या संदर्भात प्रशासनाशी पत्रव्यवहार करूनही कोणताही तोडगा निघाला नाही आणि म्हणूनच कामगारांचे प्रतिनिधी सपन मंडल यांनी पत्रकार परिषदेद्वारे ८ ऑगस्टपासून पडोली वखार महामंडल येथील सरकारी गोडाऊन मधुन पोते उचलने बंद करण्याचा इशारा दिला आहे.

त्यांनी सांगितले की, पडोली येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळात महामंडळाने २०२२-२३ या वर्षासाठी ४.१७ रुपये आणि २०२३-२४ या वर्षासाठी ४.४७ रुपये पगारवाढ निश्चित केली आहे. ही निविदा जळगाव येथील एस के ट्रान्सलाइनला देण्यात आला आहे. चंद्रपूरमध्ये दीक्षित नावाच्या व्यक्तिला किरकोळ कंत्राट देण्यात आला आहे. यापूर्वी या कामगारांना ३.१० रुपये वेतन देण्यात येत होते. महामंडळाने निश्चित केलेली वेतनवाढ स्वीकार नसल्याने कंत्राटदारांने उच्च न्यायालया नागपूर खंडपीठात माथाडी महामंडळाविरुद्ध खटला दाखल केला आणि कामगारांचे आर्थिक शोषण होत असल्याचे म्हटले. या अन्यायाविरुद्ध माथाडी कामगारांनी वारंवार सरकारी प्रशासनाला निवेदन सादर केले आहे. या संदर्भात अनेक बैठका झाल्या परंतु कधी अधिकारी आणि कधी कंत्राटदाराच्या अनुपस्थितीमुळे वेळ वाया जात आहे. माथाडी कामगारांनी कमी वेतनावर काम करण्यास नकार दिल्याने त्यांच्यावर आरोप प्रत्यारोप तर कधी धमकावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे अशी माहिती मंडल यांनी दिली.

शासन प्रशासनाकडून न्याय न मिळाल्याने माथाडी कामगार मानसिक, आर्थिक आणि शारीरिक शोषणाला बळी पडत आहेत. येत्या काळात न्याय न मिळाल्यास ८ ऑगस्टपासून ते महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पडोळी येथे धान्याच्या पोत्या उचलणे बंद करतील असे कामगार प्रतिनिधी सपन मंडल यांनी पत्रकार परिषदेद्वारे माहीती दिली.

पत्रकार परिषदेत हेमुराज सिन्हा, कमलेश साहू, राकेश पटेल, पंचराम यादव, तेजराज साहू, ललित नितेवाल, शंकर कुमराम आदी उपस्थित होते.

# कृषीमंत्री माणीकराव कोकाटेंचा राजीनामा घ्या

## कृषी कार्यालयासमोर पत्ते दाखवित केला निषेध

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी दि. २२ जुलै :** राज्याचे कृषीमंत्री माणीकराव कोकाटे हे गेल्या काही दिवसांपासून शेतकरी बांधवांसदर्भात अपमानजनक भाष्य करित आहेत.शेतक-यांना भिखारी म्हणणा-या कोकाटेंनी आता विधीमंडळात जंगली रमी जुगार खेळण्याचा निदंणीय प्रकार केला आहे.अशा असंवेदनशिल मंत्रीमहोदंयाना तात्काळ पदावरून हटविण्यात यावे.त्यांच्यावर शेतकरी अपमानप्रकरणी गुन्हे दाखल करून अटक करण्यात यावी अशी मागणी



चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी येथील शेतकरी बांधवांनी केली आहे.तालुका कृषी कार्यालयासमोर जुगाराचे पत्ते दाखवित कृषीमंत्री माणीकराव कोकाटे यांचा आज दि २२ रोजी निषेध करण्यात आला

राज्यातील शेतकरी बांधवांची स्थिती अतिशय बिकट आहे.शेतकरी आत्महत्या करण्याच्या घटनेत मोठी वाढ झाली आहे.सरकार कर्जमाफी करण्यास तयार नाही.काही ठिकाणी पाउस न झाल्याने रोवणी लांबणीवर गेली आहेत.तर काही भागात अतिपावसामुळे शेतक-यांची पिक नष्ट झालीत.

आधीच राज्यातील शेतकरी बांधवांची वाईट अवस्था असतांना सरकारचे प्रतिनीधी त्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम करित आहेत.शेतक-यांनी ज्यांच्याकळे आशेन बघाव असे कृषीमंत्री माणीकराव कोकाटे तर असंवेदशिलतेचा कळस गाठत आहेत.गेल्या काही दिवसात त्यांनी शेतकरी बांधवा संदर्भात अतिशय अपमानजनक भाष्य करित भिकारी शब्द संबोधला.आता हेच मंत्री विधीमंडळात रमी नावाचा ऑनलाईन जुगार खेळत आहेत.हा प्रकार संतापदायक आहे.त्यामुळे अशा कृषीमंत्री माणीकराव कोकाटे यांचा मंत्रीपदाचा तातडीन राजीनामा घेण्यात यावा. अशी मागणी चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी येथील शेतक?यानी केली आहे.यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी सचिन पानसरे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले.सोबतच कार्यालयासमोरच जुगाराचे पत्ते दाखवून कोकाटेंचा निषेध करण्यात आला.यावेळी अरूण वासलवार,संदीप रायपूरे,प्रसेनजीत डोंगरे,राजकुमार माणूसमारे,संतोष खोब्रागडे यांची उपस्थिती होती.

# किटाडी (तू) ग्रामपंचायत क्षेत्र मासळ (बू) गणाला जोडण्यात यावे

## गावकऱ्यांचे राज्य निवडणूक आयोगाला निवेदन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २२ जुलै :** तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीची प्रारूप प्रभाग रचना नुकतीच पार पडली. यामध्ये तालूक्यातील किटाडी ( तूकूम ) हे ग्रामपंचायत क्षेत्र खडसंगी गण (गदगाव - खडसंगी निवडणूक विभाग ) यात जोडण्यात आले. त्यामुळे किटाडी ( तू ) येथील गावकऱ्यांत असंतोष पसरला आहे. किटाडी (तू) ग्रामपंचायत क्षेत्र मासळ( बू ) गणाला ( मासळ (बू) - पळसगाव निवडणूक विभाग ) जोडण्यात यावे या मागणीसाठी गावकऱ्यांनी तहसिलदार श्रीधर राजमाने यांच्या मार्फत राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना सोमवार ला निवेदन पाठविण्यात आले.

तालुक्यापासून १५ किमी अंतरावर किटाडी (तू) ग्रामपंचायत क्षेत्र आहे.मतदार चारशेच्या जवळपास आहे. यापूर्वी किटाडी (तू) हे ग्रामपंचायत क्षेत्र जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रभाग रचना १९९८ ते २०१७ या कालावधीत मासळ (बू) या गणात सामाविष्ठ होते. भौगोलिक दृष्ट्या किटाडी ( तू ) हे ग्रामपंचायत क्षेत्र विचारात घेतले असता पश्चिम दिशेला जागतीक ताडोबा अभयारण्यचे जंगल राखीव आहे. उर्वरित पूर्व, उत्तर व दक्षिण दिशेला मासळ (बु) गणाच्या सिमा आहेत. किटाडी (तू ) या ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकांना वाहतूकीचे किंवा संपर्काचे दृष्टिकोनातून खडसंगी गणातील खडसंगी या गावापर्यत जाण्याकरीता मासळ या गणाचे क्षेत्र चिमूर नगर परिषद व गदगाव गणाचे क्षेत्रामधून जवळपास २० किमी अंतर पार करावे लागते. भविष्यात किटाडी ( तूकूम ) या ग्रामपंचायत क्षेत्राच्या विकासाकरीता गंभीर अडचन निर्माण होवू शकते. त्यामुळे भौगोलिक सिमांचे विचार केले असता फिटाडी (तू) हे ग्रामपंचायत क्षेत्र मासळ (बु) गणामध्ये ( मासळ (बु) - पळसगाव निवडणूक विभाग ) सामाविष्ट करने सोयीचे होईल. असे निवेदनात म्हटले आहे. १२ जून २०२५ मधील परिच्छेद मुद्दा क्र. ३,४ व ३,६ नुसार एखादया अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असेल तर त्याची कारणे नमूद करून एकत्र करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामूळे सदर ग्रामपंचायत क्षेत्र मासळ (बु) गणामध्ये (मासळ (बु) - पळसगाव निवडणूक विभाग ) जोडता येवू शकते. या रास्त मागणीचा विचार न केल्यास होवू घातलेल्या जिल्हा परिषद , पंचायत समिती निवडणूकीवर किटाडी ( तू ) येथिल सर्व गावकरी बहिष्कार करणार आहेत.

निवेदन देताना किटाडी (तू) येथील माजी उपसरपंच महेंद्र बारसागडे, सहादेव पोहीनकर, देविदास सहारे, विकास खाटे, सखाराम पाटील, अनिल मेश्राम, वासुदेव रासेकर, संतोष पोहिनकर, राहुल बारसागडे, कवडू रंगारी, राष्ट्रपाल मेश्राम आदि गावकरी उपस्थित होते.

# सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायतीच्या नविन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण व उद्घाटन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सिंदेवाही दि. २२ जुलै :** सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायतीच्या नविन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण व उद्घाटन सोहळा २० जुलै २०२५ रोजी पार पडला.



कार्यक्रमस्थळी मान्यवरांचे आगमन होताच लेझीम पथकांद्वारे स्वागत करण्यात आले. त्यांनतर छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांचे प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन दीपप्रज्वलण्न कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री, लोकलेखा समिती विधीमंडळ तथा आमदार विजय वडेट्टीवार उद्घाटक खासदार डॉ. नामदेव किरसान, स्वागताध्यक्ष भास्कर नन्नावार, नगराध्यक्ष सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत, प्रमुख पाहूणे माजी नगराध्यक्ष मोहीनी गेडाम, माजी नगराध्यक्ष आशा गंडाटे, कृषी बाजार समितीचे सभापती तथा तालुका कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष रमाकांत लोधे, तालुका महिला कॉंग्रेस चे अध्यक्षा सिमा सहारे, प्रमुख उपस्थिती पूजा रामटेके, उपाध्यक्ष सिंदेवाही-लोनवाही, अर्शिया जुही, मुख्याधिकारी सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती मयूर सुचक, पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापती अंजू भैसारे, महिला बालकल्याण समिती सभापती वैशाली पुपरेड्डीवार, उपसभापती अस्मिता जुमनाके, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक स्वप्निल कावळे, नगरसेवक पंकज नन्नेवार, नगरसेविका निता रणदिवे, नगरसेवक किशोर भरडकर, नगरसेवक दिलीप रामटेके, नगरसेविका मिनाक्षी मेश्राम, नगरसेवक श्याम छत्रवाणी, नगरसेविका श्वेता मोहुर्ले, नगरसेविका दिपा पुस्तोडे, नगरसेवक अमृत मडावी, नगरसेविका अपूर्वा चिंतलवार, नगरसेवक सुनिल उट्टलवार, नगरसेवक श्री युनूस शेख होते. कार्यक्रमात शहरातील अनेक प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार, जेष्ठ नागरीक, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

# ६३ विविध सामाजिक, धार्मिक, आरोग्यवर्धक कार्यक्रमांतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २२ जुलै :** नागरिकांना थेट लाभ मिळेल असे सामाजिक उपक्रम आपण देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहात आयोजित केले आहेत. आज तब्बल ६३ सामाजिक, धार्मिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा केला आहे. युवकांसाठी रोजगार मेळावा, वक्तृत्व स्पर्धा यांसारखे उपक्रमदेखील यामध्ये समाविष्ट होते. हा केवळ एक आठवडा न राहता, कधी न संपणारी सामाजिक उपक्रमांची मालिका ठरावी, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'जनकल्याण सेवा सप्ताहा'च्या निमित्ताने चंद्रपूर शहरात आज ६३ विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहर व परिसरातील विविध भागांमध्ये सामाजिक, धार्मिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक स्वरूपाचे कार्यक्रम पार पडले. या उपक्रमांमुळे शहरात उत्सवाचे आणि सेवा भावनेचे वातावरण अनुभवायला मिळाले.

सेवा सप्ताहांतर्गत रक्तदान शिबिरांचे ६ कार्यक्रम, २२ ठिकाणी महाआरती, १७ योग शिबिरे, ६ वृक्षारोपण कार्यक्रम, ३ नोटबुक वाटप, २ फळवाटप उपक्रम, तसेच वक्तृत्व स्पर्धा, रोजगार मेळावा व इतर उपक्रम असे एकूण ६३ कार्यक्रम विविध भागांत आयोजित करण्यात आले.

रक्तदान शिबिरांमध्ये शहरातील प्रतिष्ठित संस्था आणि स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. माता महाकाली मंदिर, वढा येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पंचशील चौक, महादेव मंदिर, जय हिंद चौक, शिवाजी नगर, दुर्गा मंदिर, खंडोबा मंदिर, माता मंदिर अशा विविध धार्मिक स्थळांवर महाआरतीचे कार्यक्रम पार पडले. सकाळी व सायंकाळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी झाले.

योग शिबिरांना महिलांचा विशेष प्रतिसाद मिळाला. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध ठिकाणी शिबिरांना सुरुवात झाली. प्रशिक्षित योग शिक्षकांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. वॉर्डनिहाय महिला योग शिबिरे ही वैशिष्ट्यपूर्ण बाब ठरली.

# डॉक्टरांची दिरंगाई व रुग्णालयाचा निष्काळजीपणामुळे रुग्णाचा मृत्यू

## शेख कुटुंबियांचा पत्रकार परिषदेत आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २२ जुलै :** आजकाल वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावी वृत्ती लोप पावत चालली असून वैद्यकीय क्षेत्राला व्यावसायिकिकरणाचे स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे. यादृष्टीने ख्रिस्तानंद हॉस्पिटलमध्ये अलीकडेच घडलेली घटना बोलकी आहे. नागभीड येथील मुस्तकिम शफी शेख यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने ख्रिस्तानंद हॉस्पिटल ब्रम्हपुरी येथे नेले. तेथे पेशंटला फिट्स व झटके येत असल्यामुळे डॉक्टरांनी पेशंटला व्हेंटिलेटरवर टाकावे लागेल असे सागून बेड चार्ज १०,०००रुपये लवकर जमा करून स्लीप आणण्यास सांगितले. त्यानुसार सुरवातीला पाच हजार रुपये जमा करून ११७०० रूपयांचे औषध आणले. तेव्हा पेशंटच्या भावालाच पेशंटचे शर्ट काढण्यासाठी आत (अतिदक्षता विभागात) बोलावण्यात आले, अशी आपबिती पेशंटचा भाऊ शहारूख शफी यांनी पत्रकार परिषदेत विषद करताना पुढे सांगितले की, पेशंटला अतिदक्षता विभागात टाकल्यानंतर पेशंटवर तातडीने औषधोपचार सुरू व्हायला हवे होते; पण पेशंटचे शर्ट काढण्यासाठी आपल्याला आत बोलावण्यात आले व आपण आत जाईपर्यंत पेशंटवर तातडीने औषधोपचार



सुरू करण्यात आले नव्हते. त्याबाबतीत आपण विचारणा केली व पेशंटच्या नातेवाईकांना पेशंटचे शर्ट काढण्यासाठी बोलावण्यात येते तर तुमचे कर्मचारी कोठे गेले असे म्हणताच आपल्याला हिडीसफिडीस करीत अपमानीत करून बाहेर हाकलले. हा प्रसंग बाहेर येऊन आपण सोबतीला असलेल्या नातेवाईकांना सांगितला.

त्यानंतर डॉक्टर बाहेर आल्यावर विचारणा केली असता एक ते दीड तासात सांगतो असे सांगितले; पण लगेच अर्ध्या तासातच दुसरे डॉक्टर आले असता पेशंटला लवकरात लवकर रेफर करावे लागेल असे सांगितले. त्यावर आम्ही घेऊन दिलेल्या ११७०० रुपयांच्या औषधाचे व जमा केलेल्या ५००० रुपयांचे काय ? अशी विचारणा केली असता उरलेले औषध परत होणार व पेशंटला व्हेंटिलेटरवाल्या अँम्बुलंन्सने न्यावे लागेल असे सांगितले. त्यात आमच्याकडे अँम्बुलन्स उपलब्ध आहे असे सांगून तिचा चार्ज १७००० रुपये भरण्यास सांगितले. त्याप्रमाणे अँम्बुलन्सचे १७०००रुपये भरले. मात्र ११७०० रुपयांच्या औषधांमधील औषध परत केल्यानंतर फक्त २०७० रुपये तेवढे परत केले. त्यामुळे केवळ अर्ध्या तासात व तेही तातडीने कोणताही औषधोपचार करण्यात आला नसताना ९६३०- रुपयांचे औषध पेशंटला केव्हा व कसे देण्यात आले, ही शंका व्यक्त करून चॅरिटी हॉस्पिटल म्हणून लौकिक असलेल्या हॉस्पिटलमध्ये अर्ध्या तासात बेड चार्ज ८८०० रुपये, मेडीसीन ९६३० रुपये आणि अँब्युलन्स १७००० रुपये असे एकूण ३५४०० रुपये वसूलण्यात आले.

अशा स्थितीत पेशंटला वर्धा येथे नेत असताना भिसी-गिरड मार्गावर नांद या गावाजवळ रात्री ११.३० वाजताच्या सुमारास अँम्बुलन्स बंद पडल्याने सर्वजण घाबरले. त्यानंतर सुमारे दोन वाजताच्या सुमारास दुसरी अँब्युलन्स आली. त्यात पेशंटला एका अँब्युलन्स मधून दुसऱ्या अँब्युलन्स मध्ये शिफ्ट करण्याच्या भानगडीत झालेला वेळेचा अपव्यय. परिणामतः वर्ध्याला पोचायला पहाटेचे चार वाजले. तब्बल साडेतीन तास उशीर झाल्याने पेशंटच्या डाव्या बाजूला पॅरालेसीस मारला गेला व पेशंटची स्थिती गंभीर झाली आणि पेशंट कोमात गेला. हे केवळ ख्रिस्तानंद हॉस्पिटलमधील डॉक्टरांची दिरंगाई व रुग्णालयाचा निष्काळजीपणा आणि त्यातून देण्यात आलेली चुकीची नादुरुस्त अँब्युलन्स, ती रस्त्यात बंद पडणे, दुसऱ्या अँब्युलन्सला येण्यास झालेला विलंब, पेशंटला एका अँब्युलन्स मधून दुसऱ्या अँब्युलन्स मध्ये शिफ्ट करण्यात गेलेला वेळ . परिणामतः पेशंट कोमात जाऊन दगावणे.? यांसाठी ख्रिस्तानंद हॉस्पिटलमधील डॉक्टरांवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा व चॅरिटी हॉस्पिटल असा लौकिक असलेल्या हॉस्पिटलमध्ये केवळ पैसा चालतो तेव्ह या हॉस्पिटलची चौकशी करून हॉस्पिटलवरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार परिषदेत मृतक मुस्तकिम शफी शेख यांच्या नातेवाईकांच्या वतीने करण्यात आली आहे. पत्रकार परिषदेला शहारूख शफी शेख, रियाज रफीक शेख, तन्वीर शफी शेख, हर्षिल मुस्तकीन शेख, असर मुस्तकीन शेख यांची उपस्थिती होती.






# जनसुरक्षा कायदा खरा की फसवा?



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

या कायद्यानुसार सरकारला जर एखादी व्यक्ती किंवा संघटना सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक वाटली, तर त्या व्यक्तीला कोणत्याही ठोस आरोपाशिवाय ताब्यात घेतले जाऊ शकते. हा कायदा अजामीनपात्र आहे. म्हणजेच ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला जामीन मिळणे कठीण आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, हा कायदा नक्षलवादी आणि माओवादी संघटनांवर कारवाईसाठी आहे, विशेषतः शहरी भागात तरुणांचे ब्रेनवॉश करून व्यवस्थेविरोधात उभे करणाऱ्या संघटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केला आहे. पण प्रत्यक्षात हे विधेयक नागरिकांच्या घटनात्मक स्वातंत्र्यांवर घाला घालणारे आहे. तसेच यामुळे सरकार विरोधकांची बेमालूमपणे मुस्कटदाबी करू शकणार आहे.

सदर विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाल्यास ती राज्यात हुकूमशाहीची सुरुवात असेल. हे विधेयक नागरिकांची गळचेपी करणारे आहे. हिंदी सक्तीच्या शासन निर्णयाप्रमाणे हे विधेयक सुद्धा भर चौकात जाळले पाहिजे. पण ती मानसिकता विरोधकांमध्ये दिसत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काही दिवसांपूर्वी आणीबाणी वर भाषण करत होते. मात्र प्रत्यक्षात तसेच आणीबाणी आणणारे विधेयक मांडत असताना त्यांना काहीच वाटले नाही का?

यांना सत्ता सोडणे परवडणार नाहीये हे उघड गुपित आहे. सत्ता सुटली आणि वेगवेगळ्या खात्यांच्या फाईल्स, श्वेतपत्रिका, घोटाळे, पीएम केअर्सचा ताळेबंद, नोटाबंदीच्या नंतर छापलेल्या नोटा आणि बरच काही बाहेर आलं तर परवडणारे नव्हते. तपास यंत्रणा आणि प्रशासन, सत्ता बदलली की सत्तेच्या समोर कुर्निसात घालायला तयार असतील. वाट्टेल त्या मार्गाने, वाट्टेल तशी सत्ता, ताकद, पैसा वापरून सत्ता ताब्यात ठेवण्याचा आटापिटा करतील.

पक्षीय राजकारणात सक्रीय असणारे विरोधक असोत की लोकशाही मूल्यांसाठी बोलणारे, संघर्ष करणारे सामाजिक कार्यकर्ते किंवा सामान्य भारतीय नागरिक कुणालाही प्रचलित संसदीय मार्गाने अर्ज विनंती खटले वगैरे करून बदल घडेल याची अजिबात आशा आणि अपेक्षा नाहीये. जनता सर्वोच्च आहे हे दाखवण्याची जबाबदारी आता जनतेची आहे.

देशात मोठ्या प्रमाणात काही राज्ये ही नक्षलग्रस्त किंवा मावोवाद्यांनी किंवा कडवी डावी विचारसरणीग्रस्त आहेत. अशा प्रकारच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक लोक हातात बंदूक घेऊन संविधानाने उभ्या केलेल्या व्यवस्थेविरुद्ध लढा उभारत आहेत.

याच नक्षलवादाला आळा घालण्यासाठी केंद्राच्या सूचनेनुसार आपण जनसुरक्षा विधेयक आणल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. विशेष म्हणजे जनतेच्या १२ हजार सूचनांचे वर्गीकरण करून आणि विरोधकांच्या सूचनेनुसार सर्व बदल केल्याचे फडणवीस यांनी आवर्जून सांगितले. तसेच सरकारविरोधी बोलणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यासाठी हा कायदा आणल्याची अफवा पसरली आहे.

मात्र विधेयकात अशा प्रकारची कुठलीही तरतूद नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यावर विरोधकांनीही खुशाल विश्वास ठेवावा? भविष्यात या कायद्याचे फटके बसायला सुरूवात झाल्यावर लोकं रस्त्यावर येतीलच. नक्षलवाद्यांना भारताची संसद आणि कायदा नको आहे. चीनमध्ये जशी साम्यवादी व्यवस्था उभी केली, तशी व्यवस्था त्यांनी येथे उभी करायची आहे.

देशाच्या संविधान, संसद आणि उदारमतवादाविरुद्ध युद्ध पुकारायचे ही त्यांची नीती आहे. हाच तो शहरी नक्षलवाद आहे. हे त्यांचे डिझाईन आहे. याठिकाणी भारतीय संविधानिक व्यवस्था उलटून लेनिनने चीनमध्ये उभारलेली व्यवस्था उभारण्याचा यांचा विचार आहे.

यापूर्वी अशा प्रकारचा कायदा तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओरिसा, झारखंड राज्यांनी केला. केंद्र सरकारने सर्व राज्यांना असा कायदा करण्यास सांगितले. काही संघटनांवर बंदी लागताना युएपीए कायदा लावायचा. पण सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना अशाप्रकारे कायदा लावताना मनाई केली. म्हणून सर्व राज्यांना केंद्र सरकारने कायदा करण्यासाठी सांगितले.

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हा महाराष्ट्र सरकारने मांडलेला एक कायदा आहे, जो सार्वजनिक सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांवर कठोर कारवाई करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. हा कायदा विशेषतः शहरी नक्षलवाद आणि माओवादी विचारसरणीच्या संघटनांवर नियंत्रण आणण्याच्या उद्देशाने मांडण्यात आला आहे.

जर एखादी संघटना बेकायदेशीर कार्यात सहभागी असेल आणि ती बंदी घातलेल्या संघटनेचा भाग असेल किंवा नव्या नावाने तेच कार्य करत असेल, तर ती बेकायदेशीर ठरेल. सरकारच्या मते हा कायदा नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी कृत्यांना आळा घालण्यासाठी आवश्यक आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, हा कायदा सामान्य नागरिकांचे आंदोलनाचे अधिकार हिरावून घेत नाही, तर केवळ संविधानविरोधी आणि हिंसक विचारसरणीच्या संघटनांवर कारवाई करेल. असे असले तरी शेवटी कारवाईचे अधिकार सरकारकडे जातात व ते मनमानी करू शकतात.

महाराष्ट्र हे या कायद्याची अंमलबजावणी करणारे देशातील पाचवे राज्य आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि झारखंड यांनी यापूर्वी अशा प्रकारचे कायदे लागू केले आहेत. काही सामाजिक कार्यकर्ते, डाव्या पक्षांचे नेते आणि विरोधी पक्षांनी या कायद्याला लोकशाहीविरोधी आणि व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणणारा म्हटले आहे. त्यांच्या मते, बेकायदेशीर कृत्य आणि कडव्या डाव्या संघटना यांच्या व्याख्या अस्पष्ट आहेत, ज्यामुळे सरकारला आंदोलक, पत्रकार, लेखक किंवा सामाजिक कार्यकर्त्यांना सहज अडकवता येईल. त्यांची ही भीती रास्त आहे.

आणीबाणीच्या काळात अशाच कायद्यांचा विरोधी पक्षांना त्रास झाला होता. हा कायदा सरकारविरोधी आवाज दडपण्यासाठी वापरला जाऊ शकतो. डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी या विधेयकाला एकमेव विरोध केला. मार्क्सवादी नेते प्रकाश रेड्डी, डॉ. अजित नवले यांनीही कायद्यातील त्रुटींवर बोट ठेवले. या दोन नेत्या व्यतिरिक्त बाकीच्यांचा विरोध लटका वाटला त्यात कणखरपणा नव्हता.

जनसुरक्षा कायदा फक्त कडवे डावे या शब्दावर जोर दिला आहे. कडवे उजवे असू शकत नाहीत काय? विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, श्रीराम सेना आणि त्यांची मातृसंस्था आरएसएस हे सगळे कडव्या उजव्या विचारसरणीचे नाहीत काय? या सगळ्यांना सूट कशासाठी?

कायदा करायचाच आहे तर त्यात डावे काय आणि उजवे काय सगळ्यांना समाविष्ट केले पाहिजे. पण सरकारा ते करायचे नाहीये. कारण त्यांना फक्त विरोधकांची गळचेपी करायची आहे. थोडक्यात हा कायदा जनसुरकक्षेसाठी नसून जनतेला असुरक्षित करणारा आहे. राज्यात हुकूमशाही आणणारा आहे. लोकशाहीचा गळा घोटणारा आहे. थोडक्यात सत्ताधारी असो की विरोधक असो, सगळे एका माळेचे मणी आहेत, हे आता जनतेला कळू लागले आहे.

कोणत्याही राजकारण्याला जनतेच्या हिताची पडलेली नाही; तर आपले वर्चस्व आबाधित राहावे म्हणून विरोधकांना ठेचण्याची हाव सुटली आहे. म्हणून जन चळवळींना अर्बन नक्षलींच्या पातळीवर आणणाऱ्या या कायद्याला प्रत्येक सजग नागरिकाकडून विरोध झाला पाहिजे. हे सरकार ह्सूटबूट की सरकारह्व असल्यामुळे त्यांच्या मजीर्तील उद्योगपतींना जमिनीचा पुनर्विकास सहज करता यावा आणि याला जे जे विरोध करतील त्यांना अर्बन नक्षल म्हणत कैदेत डांबता यावे, ज्यांना संविधानिक मार्गाने आंदोलन करायचे आहे, लोकशाही वाचवायची आहे, ते सगळे त्यांच्या लेखी अर्बन नक्षल असल्यामुळे त्यांना कडवे डावे म्हणत विना आरोप कैदेत टाकता यावे, म्हणून हा कायदा जनसुरक्षा या गोंडस नावाने फडणवीस आणत आहेत.

सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे हा कायदा अजामीनपात्र आहे. इंग्रजांच्या काळात पोलिसांची जशी मनमानी चालायची तसा आजच्या पोलिसांना अमर्याद अधिकार देणारा हा कायदा आहे. विरोधकांना त्यांच्यावर कुठलाही आरोप न ठेवता जेलमध्ये वर्षानुवर्षे सडवण्यासाठी हा कायदा आणला जात आहे, असे म्हटले तर चूक ठरू नये.

सरकारला विरोध केला म्हणून त्यांचे आयुष्य बरबाद करणारा हा कायदा आहे. आता या कायद्याला न्यायालयात कुणीतरी तज्ञ व्यक्तीने वा समूहाने आव्हान द्यायला हवे, असे लोकशाही जिवंत राहावी असे वाटणाऱ्या सामान्य जनतेला वाटू लागले आहे. तेव्हा ज्यांना लोकशाही जिवंत ठेवायची आहे त्या पत्रकारांनी, राजकारण्यांनी आणि विचारवंतांनी एकत्र येऊन या कायद्याला तीस दिवसाच्या आत न्यायालयात आव्हान दिले पाहिजे. अन्यथा पुढे काय होणार याचा अंदाज न केलेलाच बरा.

जनसुरक्षा कायदा महाराष्ट्राच्या जनतेवर लादणे आणि कडव्या उजव्या संघटनांस संरक्षण देण्यासाठी, राज्य सरकारला कायदा आपल्या हातात घेण्यासाठी, न्यायालयाचा हस्तक्षेप टाळण्यासाठीच हा काळा कायदा महाराष्ट्राच्या जनतेवर जबरजस्तीने लादला गेल्याची भावना सरकार आता कशी दूर करणार? उजव्या विचारसरणीच्या लोकांनी संतांना, महापुरूषांना किती छळले हे सर्वांनाच माहीत आहे. या जनसुरक्षा कायद्यामुळे संविधालाच धोका उदभवला तर काय करायचे ? महाराष्ट्रातील जनतेने हा जनसुरक्षा कायदा पास होवु नये यासाठी व्यापक जनआंदोलन उभे केले, तर सरकार ते कसे रोखणार? राज्यपाल, उच्च न्यायालय, सुप्रिम कोर्टापर्यंत जाण्याची तयारी काहींनी ठेवली आहे. विधिमंडळातील काहींनी या विधेयकाला विरोध केला तर काहींनी समर्थन केले. पण त्यात विरोधाला विशेष जोर नव्हता. विधेयक एकमताने पास झाले नसले, तरी पण सभागृहात ज्या पद्धतीने हसणे खिदळणे चालू होते, त्यावरूनच विरोधकांना त्याचे महत्त्व कळाले नाही आणि सरकारने आपला डाव साधला. सत्ताधारी पक्षाकडे जेव्हा पाशवी बहुमत असते, तेव्हा सत्ताधाऱ्यांना हवे असेच कायदे आणले जातात. अशा कायद्यांवर सभागृहात भाषणे देवून कायदे थांबत नाहीत. या राज्यातील गोंधळात जनसुरक्षा विधेयक मंजूर झालं. ही राजकीय खेळी कुणाच्या लक्षात तरी आली का? मराठीचा मुद्दा पुढे आला. जनता पेटून उठली, मोर्चा निघणार तेवढ्यात सक्ती रद्द करण्याची घोषणा होते. जनतेचा रोष थंडावतो आणि विधेयकाला होणार विरोध भाषा सक्तीकडे वळवून विधेयक मंजूर झाले. आपले एकूण राजकारणी परिपक्व नाहीत, असेच म्हणावे लागेल. कम्युनिस्ट पार्टी वगळता अन्य राजकीय पक्षांनी देखील जनसुरक्षा विधेयक अत्यंत हलक्यात घेतले. त्याचे दुष्परिणाम त्यांना भविष्यात भोगावेच लागतील. पण काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक यांच्यासाठी प्रश्न विचारावासा वाटतो की, तुमच्या पक्षाने, पक्षाच्या आमदारांनी जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात मत मांडले का? मांडले असल्यास ते विधिमंडळ कामकाजात समाविष्ट आहे का? तुमच्या पक्षाचे जे आमदार या विधेयक समितीत सहभागी होते, त्यांनी त्यांचे विरोधी मत विधेयकाच्या चर्चेत नोंदवायला आग्रह धरला का ? जर तुमच्या पक्षाच्या आमदारांनी हे केलेलं नसेल तर तुमच्यासाठी सामान्य लोकांनी हुकूमशाही राजवटीच्या विरोधात का बोलावे ?

### जनसुरक्षा कायदा जनतेच्या हिताचा पण खात्रीचा नाही

जनसुरक्षा कायदा ही जनतेची मागणी नाही. या कायद्याने जनतेचे किंवा वैयक्तिक कोणा एका व्यक्तीवर कायदेशिर कारवाईचे अधिकार नाही, तर अतिरेकी संघटनावर नियंत्रण ठेवण्याचा कायदा आहे अशी सरकार कीतीही वल्गना करत असले, तरी विश्वासार्हता गमावलेल्या सरकारवर विश्वास ठेवणे म्हणजे गाफिल राहून सरकारला हूकुमशाहीसाठी कायदेशीर परवानगी देण्याचा प्रकार आहे. भारत हा संवैधानिक लोकशाही असलेला देश आहे. लोकशाहीत सरकार नव्हे तर सर्वधर्मिय जनता देशाची मालक असते. म्हणुन जनता जे म्हणेन त्यावर अंमलबजावणी करणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. सरकारला जनतेच्या मागणी विरूध्द जाण्याचा अधिकार नाही. म्हणुन सरकारच्या निर्देशनानुसार जनसुरक्षा कायदा हा कितीही जनतेच्या हिताचा असला तरी तो खात्रीलायक नाही. परंतु तो निश्चितच भ्रमित करणारा असल्याने विधानसभेच्या बहूमतापेक्षा या कायद्याविरूध्दचा जनतेचा जनप्रक्षोभ मोठा आणि महत्वाचा आहे. म्हणुन हा कायदा फायद्याचा असला तरी जनतेला नको असेल, तर तो कायदा करण्याच्या अट्टहास न करता सरकारने जनादेशानुसार तो रद्द करायला पाहीजे. तरीही सरकार हट्ट धरत असेल तर त्यामागे नक्कीच काहीतरी धोरण असेलच ना ? आणीबाणीच्या काळाकुट्ट आठवणी आजही जनतेमध्ये आहे. या सरकारने त्याची पुन्हा आठवण येईल, अशी कृती करू नये हीच माफक अपेक्षा!

### मुख्यमंत्र्यांनी सर्वांना विश्वासात घेतल्याचे दिसते

हे विधेयक डिसेंबरच्या अधिवेशनात सभागृहात मांडले होते. सभासदांची इच्छा होती की विस्तृत चर्चा व्हावी. हे विधेयक लोकशाही पद्धतीने मंजूर व्हावे यासाठी राज्य सरकारने संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक पाठवले. या समितीत जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, मंगेश कुडाळकर, तुषार राठोड, अजय चौधरी असे सर्वपक्षीय आमदार होते. तसेच विधान परिषदेचे विक्रम काळे, सतेज पाटील, सुनिल शिंदे, उमा खापरे, अंबादास दानवे या सदस्यांनी समितीत काम केले. चंद्रशेखर बावनकुळे यांनी समिती प्रमुख काम पाहिले.

जनतेकडून जवळपास १२ हजार सूचना आल्या होत्या. त्याचे वर्गीकरण करून समितीने अंतिम अहवाल सादर केला. माओवादी विचारांनी प्रेरित होऊन अनेक लोक हातात बंदूक घेऊन संविधानाने उभ्या केलेल्या व्यवस्थेविरुद्ध लढा उभारत आहेत. गेल्या काही वर्षांत नक्षलवादाविरोधात केंद्र आणि राज्य सरकार यांनी मोठ्या प्रमाणात काम केले. बंदूक घेतलेला मावोवाद संपुष्टात यायला लागला आहे. महाराष्ट्रातील चार जिल्ह्यात माओवादी होते. आता केवळ दोन तालुक्यापुरता नक्षलवाद मर्यादित राहिला आहे. त्यामुळे जनसुरक्षा विधेयकाच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांनाच विश्वासात घेतले हे दिसून येत आहे मग असे असताना कुणा सभागृहात किंवा बाहेर त्याला विरोध कसा काय करता येईल, हा प्रश्न निर्माण होणार आहे.

# मोबाईलच्या पवित्रतेचा कळस..!

मोबाईल आज प्रत्येकाची गरज झाला आहे कोणी सोबत असो किंवा नसो मोबाइल असला म्हणजे जमलं.... त्यात लहान मुलांपासून तर प्रत्येक वयोवृद्ध पर्यंत अति महत्त्वाची बाब व तितकीच संवाद, डिजिटल मीडिया,माहिती, प्रत्येक गोष्टींचा बॅलन्स असणारा एक इलेक्ट्रॉनिक उपकरण( यंत्र) याला मराठीत भ्रमणध्वनी,दूरभाष,चलध्वनी, असे आपण म्हणतो....

-------------

साहजिकच प्रत्येकाच्या जीवनात मोबाईल शिवाय कुणाचे पानही हलत नाही....गरज, विरंगुळा, मनोरंजन,बँक, ब्रिफ केस,आठवणी साठवणीच्या खजाना, नात्यांचे संबंध ,एका क्लिक वर मन जोडणारा,मन तोडणारा,काम सोपं करणारा,आधुनिक युगात एकनिष्ठ मित्र जसा....! तसा सोबती, जिथे जाऊ तिथे अगदी सोबतचं... जन्म मरण आनंद दुःख प्रत्येक ठिकाणी आपलं मन हृदय यावर पूर्णपणे अधिराज्य करणार एक उपकरण की जे सोबत असलं की भूक तहान, थकवा,वेळ, भान, सर्व विसरून आपणास सामावुन घेऊन एक उपकरण भोगी करणारी छोटीशी वस्तू जी हजार रुपयांपासून तर लाख रुपयांत किंमत असणारी महत्वाची गोष्ट....



कुणाकडे मरण झालं की आपण मयत व्यक्तीचा अंत्यसंस्कार झाल्यावर जस घरी आलो की सर्व शरीराची शुद्धी करतो कपडे चपला ही धुऊन टाकतो मात्र आपला मोबाईल याला अपवाद आहे, महिलांना मासिक धर्मात देवपूजा व काही धार्मिक गोष्टीना हातबोट होऊ नये यासाठी नियम पाडतात.

मात्र त्याच हातानी वापरले ला मोबाईल अगदी दुसऱ्याने पूजा करताना तोच फोन वापरला की चालतो मात्र नकळत पणे हात बोट झालं किंवा पूजेच्या स्थानात स्पर्श झालेल्या व्यक्तीला गोमूत्र शिंपडून शुद्ध केल्या जाते मात्र आपला सोबती मोबाईल इथे ही सुटतो.....! व्वा खरंच म्हणजेच आजच्या युगातील सर्वात पवित्र वस्तू ही मोबाईल आहे असेच मानावे लागेल

खरं बघितलं तर सर्वात जास्त घाणेरडी वस्तु जर कोणती असेल तर ती मोबाईल आहे ज्या मोबाईलच्या स्क्रीन वर आपलं वर्चस्व असत ती स्क्रिन ही अनेक आजार, रोग, प्रसार करणार माध्यम आहे ज्यात कधी साफसफाई होत नाही त्या मुळे स्मार्टफोन वर प्रति चौरस इंचावर 25127 बॅक्टेरिया असून सार्वजनिक शौचालय च्या शीट च्य वीस पट अधिक असतात 87% लोकं मोबाईल बाथरूममध्ये वापरत असल्याचे कबूल करतात तसेच प्रत्येक 6 फोनमध्ये एक फोन इ कोलाय सारख्या अनेक घातक बॅक्टेरिया यानें दूषित असल्याचे अनेक अभ्यासात आढळून आले आहे

वाईट सवयी जसे स्वच्छतेचा अभाव, जेवतांना मोबाईल पाहणे, बाथरूममध्ये फोन पाहणे मोबाईल चा वापर केल्यावरही हाथ न धुणे तसेचं मोबाईल स्क्रीन ची नसणारी स्वच्छता ही मुख्य रोग प्रसार, जन्तु संसर्गाची शक्यता वर्तविले, जवळजवळ ५०% जन्तु हे मोबाईल च्या स्क्रीनवर असतें....

म्हणजे आपला रक्ताचा नात असणारा जीव स्वर्गवासी झाला की लगेच आपण अंघोळ करून शुध्द होतो तसा आपला फोन आपण स्वच्छ कधीतरी करतो का? हा आजचा महत्वाचा प्रश्नच आहे.. कधीतरी सॅनिटायझर किंवा ७०% आयसोप्रोफाईल अल्कोहोल ने आपला फोन साफ करायला हवा अन्यथा अनेक आजार व्हायला लागतील हे नक्कीच आपण पूर्ण घर घर आपण सण उत्सवात पूजा कार्यक्रमात स्वच्छ करतो मग मोबाईल अपवाद कसा?

इतका जिवाभावाचा की सख्या नात्या ला खांदा देणारा ही आंघोळ कधी करतो याची वाट पाहतो मात्र मोबाईल वगळतो ही मोबाईलची ख्याती म्हणावी लागेल. आज प्रत्येक जण मोबाईल वेडा तर झालाच आहे सोबत अनेक आजार मानेचे, डोळ्याचे, संसर्ग, नैराश्य, भीती ही प्रत्येक काला गिफ्ट देत आहे. अनेक परिवारात वाद विवाद , कौटुंबिक कलह जसा नकारात्मक प्रभाव दिसत असून उत्तम प्रकारे बघितल्यास अत्यन्त महत्वाचे डिजिटल माध्यम जो माहिती प्रसारासाठी महत्वाची भूमिका बजावतो. आधुनिक युगात मात्र मोबाईल सारखा कोणीही (अ) पवित्र नाही .. जो पिढी घडवतोही बिघडवतोही....

उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर.
9518571138

■ ■ ■

# शेतीमातीत राबणारे संत सावता माळी

इसवी सन १२५० मध्ये पंढरपूर जवळील आरण येथे संत सावता माळी यांचा जन्म झाला. परंपरेने आपल्या मळ्यात काम करण्याचे भाग्य त्यांच्या वाट्याला आलं. जीवनात जी कर्तव्य आपल्याला पार पाडायची असतात त्यापासून आपण पळता कामा नये. ती कर्तव्यकर्मे पार पाडीत असताना मात्र आंतरिक भक्तीमध्ये गुंतलेले राहावे हा त्यांचा प्रमुख विचार. व्यवसायातील प्रतिमा त्यांनी आपल्या अभंगवाणीत वापरल्या.मळ्यात काम करीत असताना त्यांची विठ्ठल भक्ती कधीच कमी झाली नाही.

*हाती काम आणि मुखी नाम...*

या उक्तीप्रमाणे त्यांचे जीवन होते.

आपल्या बागेची प्रेमाने जोपासना करताना त्यांना विठ्ठलाच्या अस्तित्वाची जाणीव व्हायची. ती जाणीव त्यांनी आपले अभंगवाणी मधुन प्रकट केली. सावळ्या विठ्ठलावर त्यांचे नितांत प्रेम होते. निष्काम भावनेने केलेले कर्म त्या परमात्म्याच्या कृपेस पात्र होते.

जीव मोक्षाचा अधिकारी होतो. त्या प्रेमात कुठलीही मागण्याची आसक्ती नसते. आस असते ती सावळ्या परब्रम्हाला भेटण्याची, इतकी त्यांच्या भक्तीची अवस्था उत्कट होती. सागरासारखी भरती त्यांच्या भक्तीत होती. त्या भक्तीमुळे त्यांचे हृदय प्रेम, आनंद आणि चैतन्याने भरून गेले होते.

संत नामदेव महाराज म्हणूनच त्यांचा उल्लेख सावता सागरेप्रेमाचा आगर असे करतात श्री संत सावता पंढरपुरला कधी गेले नाहीत असे सांगण्यात येते. सगळे संत पंढरपूरला जाऊन त्या



सावळ्याचे दर्शन घ्यायचे. मात्र सावळा विठ्ठल सावतोबाला भेटायला स्वतः आरणला गेला.

आजही सर्व संताच्या पालख्या आषाढी एकादशीला पंढरपुरात जातात.मात्र आषाढ वैद्य एकादशीला एक पालखी पंढरपुरातून आरण ला जायला निघते. भक्त देवाच्या भेटीला जाणे स्वाभाविक आहे. परंतु देव भक्ताच्या भेटीला जाणे ही कल्पनाच मुळात अद्भुत आहे. कारण आपल्या मळ्यातील कामापासून सावतोबाला उसंत नाही म्हणून देवाला त्यांच्या भेटीला जावं लागलं.

**धन्य तो देव, धन्य तो भक्त**

प्रारब्धाच्या गतीने जी अवस्था आपल्या जीवनाची होईल ती निमुटपणे भोगावे यासाठी ते आपल्या अभंगातून सांगतात...

*समयाशी सादर व्हावे*
*देव ठेवील तैसे रहावे*
*कोणी दिवशी बसून हत्तीवर*
*कोणी दिवशी पालखी सुभेदार*
*कोण्या दिवशी पायाचा*
*चाकर चालून जावे*

जशी वेळ येईल त्यास मानवाने तोंड द्यावे. देव ज्या स्थितीत ज्या जीवात्म्याला ठेवील तसे रहावे. एखाद्या दिवशी हत्तीवर बसण्याची संधी मिळेल तर कधी पालखीचा सुभेदार व्हाल. परंतु दुस?्या दिवशी पायी मात्र पायी चालावे लागण्याची पाळी येईल. या अभंगात ते पुढे म्हणतात.

*कोणे दिवशी होईले सद्गुरुची कृपा*
*कोणे दिवशी चुकती जन्माच्या खेपा*
*कोणे दिवशी सावत्याचा बापादर्शन द्यावे*

केव्हातरी आपल्या जीवनामध्ये सद्गुरूची कृपा होईलच. जन्म मरणाच्या फेऱ्यातून या जिवात्म्याची सुटका होईल व जन्म मरणाच्या फेऱ्या चुकतील. म्हणून संत सावतामाळी विनंती करतात की हे प्रभू मला दर्शन द्यावे इतर संताप्रमाणे संत सावता यांनीही नामस्मरणाला महत्त्व दिले आहे.

*सावता म्हणे कांते*
*जपे नामवळी*
*हृदये उन्मळी पांडुरंग*

प्रपंच आणि परमार्थाचा समन्वय साधणारी भूमिका सावतोबांनी मांडली. नामस्मरण हे एकच असे साधन आहे की त्या जोरावर हृदयामध्ये पांडुरंगाचा वास घेण्याची किमया घडते.

जातीव्यवस्थेच्या संदर्भात मत मांडताना ते सांगतात की, बरे झाले माझा जन्म हीन जातीत झाला नाही तर विनाकारण मोठेपण घेण्याचे कार्य मी केले असते व अहंकार वाढला असता.

*भक्ती केली हीन*
*याती नाही वाढली महंती*

या चराचरात परमेश्वर भरला आहे हे अद्वैती तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या अंगी बिंबवलं होतं. म्हणून शेतीची मशागत करताना ते फुलंझाडांमध्ये रमले. त्यांचेशी संवाद साधू लागले त्यांची आचरणशुद्धता उच्च कोटीची होती. सद्गुणांशिवाय भक्तीला काही अर्थ उरत नाही हा मोलाचा संदेश त्यांनी समाजाला दिला. ज्ञानदेव-नामदेवाच्या वारकरी परंपरेत शेतमळ्यात भक्तीचा सुखसोहळा साजरा करणारा भगवंताचा पाईक असलेले संत आहेत सावता माळी.

---------

प्रा. डॉ. रणजीत गणोदे
श्री. गणेश नगर, दर्यापूर.
9763428919

■ ■ ■

# अक्रोड खाण्याची योग्य वेळ कोणती?



निरोगी आरोग्यासाठी तुमच्या आहारात पौष्टिक गोष्टींचा समावेश करणे गरजेचे असते. बदलत्या वातावरणामध्ये तुमचं आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी ड्राय फ्रूट्सचा समावेश करा. अक्रोड हे आरोग्यासाठी सर्वोत्तम सुक्या मेव्यांपैकी एक आहे. अक्रोड खाल्ल्याने शरीराला ओमेगा-३ फॅटी ॲसिड मिळतात जे मेंदूच्या आरोग्यासाठी विशेषतः चांगले असतात. म्हणूनच अक्रोडला ब्रेन फूड असेही म्हटले जाते.

अक्रोड हे प्रथिने, मॅग्नेशियम, पोटॅशियम, झिंक आणि फॉस्फरससह अनेक खनिजांचा चांगला स्त्रोत आहे. अक्रोड चवीलाही चविष्ट असतात आणि त्यांचा आकारही मेंदूसारखा असतो. पोषक तत्वांचा हा पॉवरहाऊस योग्यरित्या खाल्ल्यास ते आरोग्य निरोगी ठेवते.

तज्ञांच्या मते, अक्रोड संध्याकाळी खावे. त्यात असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड, जे मेलाटोनिन आहे, मेंदूला निरोगी ठेवते आणि रात्री चांगली झोप येण्यास मदत करते. ओमेगा-३ आणि अँटी-ऑक्सिडंट्सने समृद्ध असल्याने, अक्रोड हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात. अक्रोड खाल्ल्याने आतड्यांचे आरोग्य चांगले राहते. त्यामुळे आतड्यातील निरोगी बॅक्टेरिया वाढतात. अक्रोडमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म भरपूर असतात आणि ते दाह रोखतात.

निरोगी चरबी आणि अँटी-ऑक्सिडंट्स मेंदूच्या कार्यासाठी चांगले असतात. अक्रोडाचे सेवन टाइप २ मधुमेहात देखील फायदेशीर आहे आणि ते रक्तातील साखरेची पातळी आणि इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते. अक्रोड भिजवून खाणे चांगले.

भिजवून ठेवलेले अक्रोड खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते आणि शरीर अक्रोडमध्ये असलेले पोषक घटक चांगल्या प्रकारे शोषून घेण्यास सक्षम होते. अक्रोड भिजवून ठेवल्यानंतर खाल्ल्याने ते पचण्यास सोपे होते. दिवसातून २ ते ४ अक्रोड खाऊ शकता.

भिजवलेले अक्रोड खाणे आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे. परंतु जे भिजवलेले अक्रोड खात नाहीत ते साधे अक्रोड किंवा भाजलेले अक्रोड खाऊ शकतात.

अक्रोडाचे पाणी पिणे देखील फायदेशीर आहे. यामुळे पचनक्रिया निरोगी राहते. अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिडस असतात, जे हृदयविकारांचा धोका कमी करण्यास मदत करतात. ते खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करतात.

अक्रोडमध्ये असलेले पोषक तत्व मेंदूसाठी फायदेशीर असतात. ते स्मरणशक्ती आणि एकाग्रता सुधारण्यास मदत करतात. अक्रोडमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या कमी होऊ शकते. अक्रोडमध्ये प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असल्याने ते भूक कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे वजन नियंत्रणात राहते. अक्रोडमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम सारखे घटक असतात, जे हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात.

काही लोकांना अक्रोड खाल्ल्याने ॲलर्जी होऊ शकते. पुरळ येणे, खाज सुटणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या समस्या येऊ शकतात. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### संत सावता माळी

व्यवहारात असावा धर्म
धर्मात नको व्यवहार
स्विकारता संताची शिकवण
होईल भवसागर पार ...

आप पर भाव नसे संतांजवळी
जगाच्या कल्याणा ते झिजले
अज्ञानापोटी आम्हीच त्यांना
जाती पाती मध्ये हो विभागले ..

कांदा मुळा भाजी
अवघी विठाई माझी
सावता म्हणे
कर्मा मध्येच बघा हो
विठ्ठल तो ठायी ठायी..।

## कामासोबतच पदवी शिक्षण पूर्ण करण्याची संधी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, जुलै २२ जुलै :** शहरात बेकायदेशीरपणे मांस विक्री करणाऱ्यांवर मनपाने कारवाईचा बडगा उगारला असून, नागपूर रोडवर उघड्यावर बेकायदेशीर मांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मनपाचे अतिक्रमण कर्मचारी शक्ती हटवार यांच्या मार्फत रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मनपाचे उपद्रव शोध पथक १४ जुलै रोजी झोन क्र. १ अंतर्गत नागपूर रोडवर गस्त घालत होते. येथे बेस्ट कार डील्स परिसरात रोडलगत असलम शेख मुसा,विक्री विसटकर,रफिक शेख यांच्यावर कारवाई केली

## अवैध मुरुम उत्खननामुळे शेतात खड्डेच खड्डे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २२ जुलै :** भद्रावती तालुक्यातील नंदोरी येथे पीडित 'शेतकऱ्याच्या शेतात २ एकर मध्ये रॉयल्टी पेक्षा जास्त प्रमाणात मुरूम उत्खनन करून ३५ ते ४० फूट खोदकाम करून मोठं मोठे खड्डे तयार करण्यात आले आहे. आणि त्यात पावसाचे पाणी जमा झाले असून शेतात चरणारे गाय म्हशी, अथवा रानटी जनावरे पडून मृत्युमुखी पडल्याचे चित्र दिसत आहे. झालेले हे मोठे खड्डे ज्या पीडित उमरे नामक शेतकऱ्याच्या शेतात झाले, त्यातील सभोवतालच्या शेतात येण्या जाण्याचा मार्ग या खड्ड्यामुळे बंद झाला आहे.सोनाई इन्फ्रास्ट्रक्टर, नागपूर या कंपनीकडे बल्लारशा ते वर्धा या नवीन होणाऱ्या तिसऱ्या रेल्वे लाईनला लागणारा मुरूमचे काम याच कंपनी कडे आहे.

# रामबाग मैदानावर खड्डा व वृक्षतोड लोकप्रतिनिधींचे अपयश

### संघर्ष समितीची भूमिका, वृक्षतोडीच्या ठिकाणी केली १०० वृक्षांची लागवड

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २२ जुलै :** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी तसेच बस स्थानक व रेल्वे स्थानकापासून अत्यंत जवळ असलेल्या जि.प.च्या जुन्या इमारतीच्या ठिकाणी २ एकर जागा उपलब्ध असतांना प्रशासनाने रामबाग मैदानावर नविन इमारत बांधण्याचा अट्टाहास करणे, पहिल्यांदा मैदानावर खड्डा व दुसऱ्यांदा १०० वृक्षांची कत्तल केल्यानंतर इमारतीची जागा बदलवणे,प्रशासनाचे हे नियोजन समजण्या पलीकडचे आहे. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी वेळेवर जागे झालो असतो तर कदाचित रामबागवर खड्डा व वृक्षतोड झाली नसती. त्यामुळे रामबाग मैदानावर




खड्डा व वृक्षतोड होणे शहरातील सर्व लोकप्रतिनिधींचे सामूहिक अपयश आहे,अशी भूमिका रामबाग मैदान बचाव संघर्ष समितीचे पप्पू देशमुख यांनी व्यक्त केली.

रामबाग मैदानावर झालेल्या वृक्षतोडीच्या विरोधात आज २२ जुलै रोजी सकाळी ८ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण आंदोलनाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना 'शतायुषी व्हा', अशा शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच 'रामबाग मैदान आरक्षित करा, नेहमीसाठी सुरक्षित करा' अशी मागणीही या आंदोलनातून करण्यात आली.या आंदोलनाच्या वेळी देशमुख यांनी आपली भूमिका व्यक्त केली. जोपर्यंत जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे बांधकाम स्थलांतरित होणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहील असे त्यांनी यावेळी जाहीर केले.

विशेष म्हणजे स्थानिक पर्यावरणाला पूरक अशा देशी वृक्षांची यावेळी लागवड करण्यात आली. कडूनिंब, आंबा,आवळा, अर्जुनी, सागवान,जांभूळ, सिताफळ अशी एकूण १०० वृक्ष आंदोलनात सामील नागरिकांनी लावली. वृक्षतोड झालेल्या ठिकाणाच्या जवळ खड्डे करून सर्व झाडे लावण्यात आली.

या आंदोलनामध्ये संघर्ष समितीचे राजेश अडूर, अक्षय येरगुडे,मंतोष देबनाथ, रवींद्र माडावर, कुशाबराव कायरकर, भाविक येरगुडे, विलास माथनकर, महेंद्र राळे, रवी पचारे,राजेश ठाकूर, वनिता साठोणे, विजय बदखल, चंद्रकांत वासाडे, दिलीप होरे, नवनाथ डेरकर, प्रवीण अडूर, नितीन बन्सोड, इमदाद शेख,अशोक दिघीकर,आनंद वनकर, अरुण भेलके, मुकेश वाळके,पवन अधिकारी,सिनु,प्रदिप दास,बलराम शाह, सुभाष पाचभाई, अश्विन माहुर्पवार,अतुल शुक्ला, अमोल घोडमारे,प्रफुल बैरम अजित दखणे,नामदेव पिपरे इत्यादी सदस्य तसेच सराव करणाऱ्या युवक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

# पार्किंग व्यवस्था नाही, पण दंड मात्र ठोठावला !

### नागरिकांत नाराजीचा सूर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २२ जुलै :** राजुरा तहसील कार्यालय परिसरात दुचाकी वाहनावर वाहतूक पोलिसांनी ५०० रुपयांचा दंड ठोठावल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातून आलेले नागरिक शासकीय कामांसाठी तहसील कार्यालयात विविध कामासाठी येतात मात्र, प्रशासकीय दुर्लक्षामुळे पार्किंगसाठी कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नाही.त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे

पार्किंगची सोय नसल्यामुळे नागरिक मिळेल त्या जागी आपली वाहने उभी करतात.अशाच प्रकारे लावलेल्या अनेक दुचाकीवर वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली.ही कारवाई अनेक नागरिकांना अन्यायकारक वाटत असून, त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.तहसील कार्यालयाचा परिसर मोठा असूनही नियोजनाच्या अभावामुळे वाहनांसाठी विशिष्ट जागा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकात गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे



बसस्टँड,मुख्य मार्गावरील राष्ट्रीयकृत बँक,गांधी चौकातील बाजारपेठ आदी परिसरातील ठिकाणी होणाऱ्या अव्यवस्थित पार्किंगकडे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्षही अधोरेखित झाले आहे. अशा ठिकाणी पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होतो, तरीही पोलिस बघ्याची भूमिका घेतात,असा आरोप नागरिक करत आहेत.'फक्त तहसील परिसरातच कारवाई का?' हा प्रश्न आता नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरतो आहे. वाहतूक पोलिसांची ही भूमिका पक्षपाती वाटत असल्याची भावना निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयात योग्य पार्किंग सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भद्रावती न. प.च्या अधिपत्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे ऑडिट स्ट्रक्चर करून दुरुस्ती करावी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २२ जुलै :** काही महिन्याअगोदर महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा समुद्रकिनारी बसविलेला पुतळा पडला त्या विषयाला घेवून संपुर्ण महाराष्ट्रात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्या अनुषंगाने भद्रावती नगर परिषदेच्या हद्दीत व नगर परिषदेच्या अधीनस्त येत असलेल्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा जुना बसस्टॉपवर उभारण्यात आला. मात्र डॉ.



बाबासाहेबांच्या पुतळ्याला खुप वर्षे झाल्याने पुतळ्याचा काही भाग जिर्ण होत आहे. अशातच या पुतळ्याला वातावरणातील कमीजास्त होत असलेल्या वातावरणामुळे व इतर प्रदुषणामुळे मोठ्या प्रमाणात हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय जनता पार्टी अनु. जाती मोर्चाच्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यांचे ऑडीट स्ट्रक्चर करून तज्ञांच्या मार्गदर्शनात समिती नेमून त्या समितीच्या अहवालानुसार कार्य पुर्णत्वास नेवून सोबतच या पुतळ्याच्या परिसराचे बाबासाहेबांच्या पुतळ्याला शोभेल असे सौंदर्यीकरण करावे. पुतळ्याची हानी कशी टाळता येईल यावर लवकरात लवकर निर्णय घेवून उपाययोजना करण्यात यावी. जेणेकरून भविष्यात विपरित घटना घडणार नाही.अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय वानखेडे यांनी मुख्याधिकारी डॉ.विशाखा शेळकी व आमदार करण देवतळे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# घुग्घुस शहरात आ.जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आरोग्यासाठी मंदिरात प्रार्थना

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २२ जुलै :** घुग्घुस येथे दि.२२ जुलै २०२५ मंगळवार रोजी सर्वप्रथम चंद्रपूर मतदारसंघातील आ.किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे जेष्ठ नेते व मोठ्या संख्येने उपस्थित पदधिकारी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आले.

तसेच अनेक मंदिरात जावुन त्यांच्या दीर्घायुष्य, उत्तम



आरोग्य,यशस्वी करिता पुजा,महाआरती आणि प्रार्थना करण्यात आली. तसेच विविध ठिकाणी फळवाटप करण्यात आले. व अनेकानेक ठिकाणी व भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी भा.ज.पा युवा नेता आशिष मासिरकर, बैरमबाबा मंदीर देखरेख व अध्यक्ष श्याम आगदारी,माजी.बहुजन आघाडी महिला अध्यक्षा सौ.उषाताई आगदारी,वनिता नियाल,संध्या जगताप,अल्का भंडारकर,ज्योती बावरे, श्रध्दा पोनाला,नागतुरे बेबिताई, सूरज मोरपाका,भुदेवी अटेला, पुनम मस्के, शुशिला डाकरे, भारत साळवे,नथुजी ठेंगणे, मालेकर,मंगेश मडावी मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# जिद्द चिकाटी आत्मविश्वास असेल तर यश तुमच्या पदरात पडेल

### मोनाली वांढरे यांचे प्रतिपादन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि. २२ जुलै :** यश ही कधी सहज मिळणारी गोष्ट नाही. त्यासाठी अथक परिश्रम जिद्द चिकाटी आत्मविश्वासाची गरज असते पण यश मिळाल्यावर त्याला योग्य प्रकारे जपणे ही तितकेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन उप अधीक्षक, भूमि अभिलेख राजपत्रित अधिकारी मोनाली वांढरे यांनी केले.



विश्वकर्मीय सुतार (झाडे) समाज महासंघातर्फे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा १३ जुलै २०२५ रोजी नागपूर येथे पार पडला. यावेळी विदर्भातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी माजी उपाध्यक्ष प्रल्हादराव नवघरे तर विशेष अतिथी म्हणून आमदार प्रवीण दटके, हे होते प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोनाली वांढरे चंद्रपूर, पराग नवलकर उपस्थित होते. यावेळी महासंघाच्या माजी पदाधिकारी आणि सदस्यांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा पार पडला. यावेळी महासंघाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. ज्योती राखुंडे, सतीश माणूसमारे, रत्नाकर पोटे, दीपक झाडे, संतोष बोरीकर, सल्लागार प्रभाकर नवघरे,वासुदेव वांढरे आदी उपस्थित होते.

# शिवराज वाहतूक सेनेच्या उपाध्यक्ष पदी टेकाम

**महासागर प्रतिनिधी**

**वरोरा दि. २२ जुलै :** शिवसेना (शिंदे) माजी लोकसभा गटनेते, उपनेते राहुल शेवाळे , अध्यक्ष अब्दुल समद शेख, सरचिटणीस, एस. के. अली, जिलाध्यक्ष गुलाम गौस सिद्दीकी, किरण जाधव, नेते यांच्या द्वारे चंद्रपूर येथील विश्राम गृहात झालेल्या कार्यक्रमात सुनील तुकाराम टेकाम यांची शिवराज्य वाहतूक सेना चंद्रपूर लोकसभा (चंद्रपूर, बल्लारशा, राजुरा विधानसभा) उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली विश्रामगृह येथे झालेल्या कार्यक्रमात उपाध्यक्ष सुनील टेकाम यांनी शिवराज्य वाहतूक सेनेचा विचार तळागाळातील जनसामान्य वाहतूक



दारापर्यंत पोहोचवण्याचे अविरत कार्य करत राहील असे त्यांनी सांगितले, यावेळी जिल्हाप्रमुख गुलाम गौस सिद्दीकी, बंडू हजारे जिल्हा प्रमुख (राजुरा ब्रम्हपुरी, )जिल्हा उपाध्यक्ष इरफान शेख यांच्या सह विविध पदाधिकारी यांचे भाषणे झाली. या कार्यक्रमाला रहीम शेख, अफसर शेख ,आरिफ शेख ,मोहम्मद अजहर ,यीशु शेख ,अरमान शेख ,साहिल शेख , समीर खान ,धीरज भाई ,शैलेश भाई, अबरार कुरैशी, अनवर शेख , युसूफ भाई , मोहम्मद अतीक , वैभव भाव , मोहसिन खान यांच्यासह असंख्य कार्यकर्ते यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# रानभाजी महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २२ जुलै :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर द्वारे आयोजित रानभाजी महोत्सवाला चंद्रपूरकरांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला असून दररोज सरासरी एक लाख रुपयांची आर्थिक उलाढाल या महोत्सवादरम्यान अनुभवास मिळाली.

शहरातील मौलाना अब्दुल कलाम आझाद गार्डन येथे १८ जुलै रोजी रानभाजी महोत्साचे उद्घाटन झाल्यनंतर सलग पाचही दिवस शहरातील नागरीक, नामवंत व्यक्ती, डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक, पर्यावरणप्रेमी, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विविध शासकीय विभागांतील अधिकारी-कर्मचा-यांनी या महोत्सवाला भेट दिली. तसेच येथील स्टॉलवरील उत्पादने आणि माळरानातील भाज्यांची खरेदी केली.

जिल्ह्यातील रानभाज्या संकलन करणारे आदिवासी बांधव, बचत गट, माविम, आत्मा, उमेद, वनधन विकास केंद्र, फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी इत्यादी संस्थांकडे नोंदणीकृत असलेले महिला व पुरूष बचतगट यांनी रानभाजी महोत्सवामध्ये भाग घेऊन आपल्या उत्पादनांची विक्री केली. या महोत्सवामध्ये दररोज सरासरी एक लाखापेक्षा अधिक रूपयांची आर्थिक उलाढाल होऊन आदिवासी बांधवांना त्याचा प्रत्यक्ष फायदा पोहोचला आहे.



या रानभाजी महोत्सवामध्ये रानभाजी, रानफळे, रानमेवा, वनौषधी, अन्नधान्य इत्यादी क्षेत्रात उत्पादन, संकलन, विपणन करणारे नोंदणीकृत आदिवासी बचतगट, व्यक्ती, संस्था यांनी प्रकर्षाने सहभाग नोंदविला. शेती किंवा निगा न करता निसर्गत:च उगवलेल्या व विशेषकरून चंद्रपूर जिल्ह्यामधील रानावनातून, बांधावरून गोळा केलेल्या शेरडीरे, मशरूम, टेकोडे, काटवल, पांढरा कुडा, कुळमुळी, केना, कोंबडा, तरोटा, धानभाजी, पातूर, गोपण, टट्टूची फुले, केना, चुचूर, इकदोडे, पानवेल, मसाला पान, बांबूवाष्टे, भराटी, मटारू, राजगिरा, रानआले, रानकोचई, रानमटाळू, वाघोटी, रानकोचई इत्यादी रानभाज्या व रानफळे तर पानफुटी, कांडवेल, गुळवेल, अमरवेल, अश्वगंधा, पळस, अर्जून अश्या औषधी वनस्पती प्रदर्शनास व विक्रीस उपलब्ध होत्या. विविध पारंपारीक आदिवासी खाद्यपदार्थांचे स्टॉल्सदेखील या महोत्सवादरम्यान लावण्यात आले होते.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी घेतली मुख्यमंत्र्याची भेट

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि. २२ जुलै :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी रविंद्र शिंदे आणि उपाध्यक्षपदी संजय डोंगरे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली. या पार्श्वभूमीवर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आमदार किशोर जोरगेवार, आमदार किर्तिकुमार भांगडिया आणि आमदार करण देवतळे यांच्या सोबत उमरेड येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.




मुख्यमंत्र्यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. चंद्रपूर जिल्ह्यातील सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी बँकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची ठरली.

यावेळी बँकेचे संचालक मंडळही उपस्थित होते. ही भेट सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली असून जिल्ह्यातील आर्थिक विकास, सहकारी संस्थांचे मजबुतीकरण व शेतकऱ्यांपर्यंत कर्जपुरवठा सुलभ करण्यासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यावेळी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचप्रमाणे, आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर मतदार संघात सुरू केलेल्या 'देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह' उपक्रमाची माहिती मुख्यमंत्र्यांनी जाणून घेतली आणि या सामाजिक उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या

# शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभाग घ्यावा

**महासागर प्रतिनिधी**

**सावली, दि. २२ जुलै :** बरेच शेतकरी शेतपीक उत्पादन वाढविणे करीता नवनव्या तंत्रज्ञानाचा व कल्पकतेचा वापर करून शेतीत प्रयोग करीत असतात अश्या प्रयोगशील शेतकऱ्यांना चालना मिळून त्यांनी अधिक उमेदीने शेती कार्य कारणे करीता तसेच त्यांनी उत्पादन वाढीकरिता अवलंबलेल्या तंत्रज्ञानाचा परिसरातील इतरही शेतकऱ्यांना फायदा होण्याचे दृष्टीने, राज्यात कृषि विभागाचे वतीने अन्नधान्य, कडण्या व गळीत धान्य पिकांकारिता तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर पिक स्पर्धेचे आयोजन प्रती वर्षी करण्यात येते.सदर योजनेत तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तरावर पहिले पहिले बक्षीस अनुक्रमे ५०००, १००००व ५०००० तसेच दुसरे बक्षीस अनुक्रमे ३०००, ७००० व ४०००० तर तिसरे बक्षीस अनुक्रमे २०००, ५००० व ३०००० बक्षीस आहे.

# ओबीसी महामंडळाच्या अनेक योजनांचा लाभ घ्यावा - प्रा. प्रकाश बगमारे

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २२ जुलै :** राज्यातील ओबीसी प्रवर्गातील लोकांना स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी बहुजन कल्याण ओबीसी विभाग अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या वतीने २० टक्के बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना ,वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना ,शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना अशा विविध योजना राबविण्यात येतात .या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रामीण बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती बँके मार्फत या योजना राबवली जाते यामध्ये महामंडळाचा सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के आणि लाभार्थ्याचा ५ℨ सहभाग असतो योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना पाच वर्ष कालावधीच्या परतफेडी साठी पाच लाख रुपये पर्यंत कर्ज योजना महामंडळातर्फे राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय व विकास महामंडळ येथे संपर्क साधावा असे आवाहन ओबीसी समाजातील युवकांना प्रा प्रकाश बगमारे ,प्रदेश सचिव, भाजपा ओबीसी मोर्चा यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

# घुग्घुस येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर व वृक्षारोपण कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २२ जुलै :** घुग्घुस येथे चंद्रपूर मतदारसंघातील लोकप्रिय आ.किशोर जोरगेवार याच्या सूचनेनुसार भा.ज.पा.नेते आशीषभाऊ मासिरकर यांनी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

माता मंदिर, साईनगर प्रभाग नं.२ रक्तदान शिबीर, वृक्षारोपण व विविध कार्यक्रम आयोजित केले.

भा.ज.पा.नेते आशीषभाऊ मासिरकर मनोगत व्यक्त करीत म्हणटले माझे प्रेरणास्थान लोकप्रिय आ.किशोरभाऊ जोरगेवार यांच्या



मार्गदर्शनात व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केले.तसेच

रक्त देणगी हे एक उत्तम कार्य आहे जे केवळ इतरांना मदत करतेच नाही तर आपल्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. आपण रक्त देण्यास पात्र असल्यास, कृपया पुढे या आणि एखाद्यास जीव वाचविण्यात मदत होवु शकते.

झाडे लावण्यासाठी आणि त्याची काळजी घेणे जेणेकरून वातावरण आणि वन्यजीव वाचू शकतील. हे हवा शुद्ध करण्यात, हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास, मातीची धूप रोखण्यात आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यात मदत होईल.

याप्रसंगी भाजप नेते श्री.आशिष मासिरकर,माजी.सरपंच संतोष नूने, अनिल बाम, साजन गोहणे,राजेंद्र लुटे,रत्नदीप कोडांवार,रविन्द्र गिवे, सुचिताताई लुटे, सुनिता गिवे,सुनिता पाटील, कविता दास, प्रिया कलवल व मोठ्या संख्येने महिला, नागरिक उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## झोपेनंतरही आळस येतोय?



जाणून घ्या

डॉ. कुंदन गायकवाड

रात्रीचे चांगले झोपूनही दिवस आळसात जात असल्याची अनेकांची तक्रार असते. मग कामाच्या ठिकाणी डुलक्या काढाव्या लागतात. शरीराला थकवा जाणवतो. कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. सारखी डोळ्यावर झापड येते. असे होत असेल तर याकडे दुर्लक्ष करु नका. ही लक्षणे एका गंभीर समस्येचे संकेत असू शकतात.

* **हायपर सोम्निया:** रात्रीच्या जागरणानंतर दिवसा झोप येणे ही सामान्य बाब आहे. परंतु रात्री नीट झोपल्यानंतर दिवसा सारखा आळस येत असेल तर हा प्रकार हायपरसोम्निया असू शकतो.

* **मद्य:** जास्त मद्यपान केल्याने झोपेवर परिणाम होतो. त्यामुळे दिवसभर झोप येऊ शकते.

* **स्नायू कमजोर:** शरीरातील स्नायू कमजोर असतील, तर वारंवार झोप येऊ शकते.

* **रात्रीची नीट झोप न येणे:** अनेकांना रात्रीची झोप येत नाही. त्यामुळे रात्री बिछान्यात तळमळत पडावे लागते. याने हायपरसोम्नियाचा धोका आणखी वाढतो.

* **औषधाचे साईड इफेक्ट:** अनेकदा औषधांच्या साईड इफेक्टमुळे हायपरसोम्नियाचा त्रास होऊ शकतो. यामुळे दिवसा झोप अधिक येते.

* **मधुमेह:** मधुमेह झाल्यानंतर शरीरात साखरेचे प्रमाण वाढले तर हायपरसोम्नियाचा त्रास वाढू शकतो. मधुमेहामध्ये शरीर ग्लुकोजचे ऊर्जेत रुपांतर करण्यात असमर्थ असते. यामुळेही दिवसाचा थकवा आणि झोप येते. वारंवार तहान लागणे आणि लघवीला येणे, वजन कमी होणे ही याची लक्षणे आहेत.

* **थायरॉईड:** हायपोथायरायडिज्ममध्ये थायरॉईड ग्रंथी प्रभावित होतात. यामुळे सुस्ती, थकवा आणि वारंवार झोप येण्याची समस्या वाढते. वजन वाढणे, थंडी वाजणे आणि केस गळणे याचे लक्षण आहे.

* **अॅनीमिया:** अॅनिमियामध्ये हिमोग्लोबीन कमी असल्याने शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे थकवा आणि झोपेची समस्या वाढू शकते.

**काय आहेत लक्षणे ?**

* अँग्झायटी आणि स्ट्रेस * चिडचिडेपणा * दिवसभर चिडचिडपणा * शरीर थकलले वाटणे * सर्व गोष्टींवर राग येणे * सकाळी झोपेतून उठूच नये असे वाटणे * डोकेदुखी * भूख न लागणे * वारंवार एखादी गोष्ट विसरणे * बेचैन झाल्यासारखे वाटणे * एकाग्रता करताना अडचण येणे

## आणखी एक रक्तगट!




नवे काही

डॉ. नीता पाटील

आतापर्यंत तुम्ही अनेक रक्तगटांबाबत ऐकले असेल. मात्र शास्त्रज्ञांनी एक नवा रक्तगट शोधून काढला आहे. याचे नाव 'ग्वाडा निगेटिव्ह' असे ठेवण्यात आले आहे. शास्त्रज्ञांना एका महिलेमध्ये हा नवीन आणि अत्यंत दुर्मिळ रक्तगट सापडला आहे.

प्रत्येक व्यक्तीचा एक रक्तगट असतो. मात्र आता अजून एक नवा रक्तगट समोर आला आहे. विशेष म्हणजे हा रक्तगट आजवर फक्त एका महिलेमध्येच आढळला आहे! या महिलेच्या रक्तगटाशी एकूण ४७ पैकी एकही रक्तगट मॅच होत नाही. त्यामुळे यासोबत संबंधित उपचार करणे फारच कठीण मानले जाते.

फ्रान्समधील संशोधकांनी हा नवीन रक्तगट शोधून काढला आहे. संशोधकांनी या रक्तगटाला 'अल्ट्रा रेअर' म्हणजेच 'अत्यंत दुर्मीळ' म्हणून घोषित केले आहे. या रक्तगटाची नोंद ग्वाडेलूप बेटावर राहणाऱ्या एका महिलेच्या शरीरातून झाली आहे.

वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार हा आतापर्यंतचा ४८वा ओळखलेला ब्लड ग्रुप आहे.

फ्रान्सच्या इएफएस रक्तपेढीने या रक्तगटाला ग्वाडा निगेटिव्ह असे नाव दिले आहे.

आत्तापर्यंत हा जी निगेटिव्हव रक्तगट असलेली ही एकमेव रुग्ण (महिला) आहे. या रक्तगटाचा शोध खरेतर २०११ सालीच सुरू झाला होता. त्या वेळी या ५४ वर्षीय महिलेची एक शस्त्रक्रिया होणार होती आणि त्यासाठी रक्ताची गरज होती. मात्र आश्चर्य म्हणजे कोणत्याही रक्तदात्याचे रक्त तिच्या रक्ताशी जुळत नव्हते. त्यामुळे डॉक्टरांनी तिचे हिमोग्लोबिन वाढवण्याचे वेगळे प्रयत्न सुरू केले. याच दरम्यान तिच्या रक्तात एक खूपच वेगळ्या प्रकारची अँटीबॉडी आढळून आली. हे काहीतरी वेगळे असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले.

रक्तगट केवळ रक्त देतानाच नाही तर अवयव प्रत्यारोपण आणि काही विशिष्ट आजार ओळखण्यासही महत्त्वाचा ठरतो. योग्य रक्तगट न मिळाल्यास रुग्णाचा जीवसुद्धा जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नव्या रक्तगटाचा शोध वैद्यकीय क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचा असतो. अमेरिकेतील सीडीसी (सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शेशन) या आरोग्य संस्थेनुसार अमेरिकेत दरवर्षी जवळपास १.४ कोटी युनिट्स रक्त देण्यात येते. त्यामध्ये ए, बी, ओ हे सर्वसामान्य गट असले तरी जगात अनेक दुर्मीळ रक्तगट सुद्धा आढळले आहेत. आता या नव्या ब्लड ग्रुपचीही इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्युजनने अधिकृत नोंद घेतली आहे.

## मांजरामुळे होतो स्किझोफ्रेनिया?



आरोग्यवेध

डॉ. दिलीप शिरसाट

घरात कुत्रा किंवा मांजर पाळणे अनेकांना आवडते. या पाळीव प्राण्यांचा घरच्यांना चांगलाच लळा लागतो. अगदी त्यांना घरातील व्यक्तीसारखीच वागणूक दिली जाते. त्यांचे खाणे, फिरणे यांच्याकडे कटाक्षाने पाहिले जाते. पाळीव प्राण्यांमुळे मानसिक आरोग्य चांगले राहते. मात्र मांजरांबाबत एक धक्कादायक, आश्चर्यकारक संशोधन समोर आले आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठातले मांजरांबाबतचे एक संशोधन समोर आले आहे. या संशोधनानुसार पाळीव प्राण्यांमुळे काही आजार होतात.

मांजरामुळे स्किझोफ्रेनिया हा मेंदूचा गंभीर आजार होऊ शकतो. अमेरिकेत १० ते ३० टक्के लोक एका स्किझोफ्रेनिया आजाराने संक्रमित आहेत. कमी शिजवलेले मांस खाल्ल्याने किंवा मांजरीच्या विष्ठेच्या संपर्कात आल्याने स्किझोफ्रेनिया होतो. स्किझोफ्रेनिया मेंदूवर गंभीर परिणाम होतो, त्यामुळे नैराश्यात जाऊ शकता किंवा विस्मरणासासारखा आजार होऊ शकतो.

* **स्किझोफ्रेनिया मांजरींमधून कसा पसरतो?**

संशोधकांच्या मते, टॉक्सोप्लाझ्मा गोंडी हा परजीवी मांजरींपासून मानवापर्यंत पोहोचू शकतो. यामुळे मानवांमध्ये स्किझोफ्रेनिया विकसित होऊ शकतो. संशोधकांच्या मते टॉक्सोप्लाझ्मा गोंडी थेट मेंदूच्या न्यूरोट्रांसमीटरवर परिणाम करू शकतात आणि सूक्ष्म अल्सर तयार करू शकतात. संशोधकांच्या पथकाने १७ अभ्यासांचा आढावा घेतला. त्यानंतरच हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. गेल्या ४४ वर्षांत अमेरिका आणि ब्रिटनसह ११ देशांमधील विद्यमान संशोधनातील डेटाचे विश्लेषण केले आहे. त्यांना २५ वर्षापूर्वी मांजरींच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना स्किझोफ्रेनिया होण्याची शक्यता जवळजवळ दुप्पट असते, असे आढळले.

## लाभदायी कटुकी



आयुर्वेद आणि विकार

कटुकी ही एक आयुर्वेदिक वनौषधी आहे. डोंगराळ भाग तसंच पर्वतरांगांमध्ये आढळणारी कटुकी ही अत्यंत दुर्मीळ वनौषधी मानली जाते. औषधी गुणधर्मांमुळे आयुर्वेदिक औषधांमध्ये कटुकीचा वापर केला जातो. कडवट चव असणाऱ्या कटुकीच्या गुणधर्मांविषयी...

* वजन कमी करायचं असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने कटुकीचं सेवन करता येईल. कटुकीमुळे पचनशक्ती सुधारते. तसंच चयापचय क्रियेची गती वाढल्यामुळे वजन कमी व्हायला मदत होते.

* कटुकीमध्ये दाह कमी करणारे गुणधर्म असतात. सध्याच्या वातावरणात खराब हवा आणि प्रदूषणामुळे अस्थमा तसंच श्वसनाचे विकार असणाऱ्यांना श्वास घ्यायला त्रास होतो. अशा वेळी कटुकीच्या सेवनामुळे लाभ होऊ शकतो. अस्थमाच्या रुग्णांसाठी कटुकी लाभदायी ठरू शकते.

* ताप आल्यावर तुम्ही एखादी गोळी घेऊन झोपता. मात्र अश वेळी कटुकीचं सेवन करता येईल. कटुकीमुळे ताप उतरायला मदत होते. कटुकीची पूड करून पाण्यासोबत घेता येईल. कटुकीमुळे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आणि सर्दी, खोकला, ताप अशा आजारांपासून बचाव होतो.

## बुरशीपासून करा बचाव

पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे या ऋतूत अनेक आजार होण्याची भीती असते आणि अनेकांना त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवू लागतात. बुरशीजन्य संसर्ग म्हणजेच 'फंगल इंफेक्शन' टाळण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.



व्याधी विचार

डॉ. महेश दळे

पावसाळ्यात त्वचचे संसर्ग होण्याचे प्रमाण खूप वाढते. त्यामुळे या ऋतूत काही गोष्टी आधीच लक्षात ठेवल्या तर हे संसर्ग टाळता येतात.

त्वचेचे संसर्ग टाळण्यासाठी त्वचा स्वच्छ आणि कोरडी ठेवणे खूप महत्वाचे आहे. आंघोळ केल्यानंतर ताबडतोब टॉवेलने अंग पुसून घ्या आणि मान, पाय आणि काखेच्या भागाच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. घाम आल्यावर टॅल्कम पावडर वापरा आणि त्वचा सुती कापडाने पुसून घ्या.

तुम्ही पावसात भिजला असाल तर त्यानंतर घरी गेल्यावर लगेच साध्या पाण्याने आंघोळ करा. पावसात भिजल्यानंतर डोके स्वच्छ करा. ओल्या कपड्यांमध्ये जास्त वेळ राहू नका. त्यामुळे पुरळ आणि मुरुम यासारख्या समस्या उद्भवतात.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये कामावरून किंवा इतर कुठूनही घरी आल्यावर लगेच घरामध्ये वावरू नका. त्याआधी येऊन हातपाय धुवा. विशेषतः पादत्राणे ओली झाली तर स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. कारण पावसाळ्यात पायांच्या बोटांमध्ये त्वचेचा संसर्ग होण्याचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो.

बरेचदा पावसात कपडे दमट राहतात. त्यामुळे असे कपडे घालणे टाळा. तुमचे कपडे, टॉवेल इत्यादी योग्यरित्या उन्हात ठेवा. विशेषतः अंतर्वस्त्रे फक्त उन्हात वाळवा. तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या त्वचेच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर स्वतःच औषधे घेण्याऐवजी त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या .

## असेही फोबिया



आरोग्यवेध

प्रत्येकालाच कशाची तरी भीती वाटते. काहीजण विमानात बसायला घाबरतात. काहींना एकटेपणाची तर काहींना अंधाराची भीती वाटते. पाली, झुरळ यांना घाबरणाऱ्यांची संख्याही कमी नाही. याच भीतीला वैद्यकीय भाषेत फोबिया म्हणतात. काहींना ठराविक गोष्टीची भीती वाटते. ही भीती इतकी तीव्र असते की त्यांना काहीच करता येत नाही. या भीतीमुळे व्यक्तीच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम होतो. विविध प्रकारचे फोबिया नेहमीच चर्चेत असतात. जीवनशैलीतले बदल तसंच इतर काही कारणांमुळे या भीतीत भर पडत चालली आहे. फोबियांचे प्रकार बदलत आहेत. फोबियाच्या नव्या प्रकारांचा शोध लागला आहे. त्याविषयी...

* इको-एंक्झायटी हा प्रकार सध्याच्या काळात नवा आहे. पर्यावरणाच्या हानीबद्दलच्या बातम्या सतत येत असतात. पृथ्वीचं वाढतं तापमान, वितळणारा बर्फ जंगलांना लागणाऱ्या आगी यामुळे पृथ्वीवरची जीवसृष्टी धोक्यात आली आहे, असा अनेकांचा समज होतो. अनेकांच्या मनात हवामानबदलाच्या दुष्परिणामांची भीती बसली आहे. त्यातही तरुणांना आपल्या भविष्याची खूप काळजी वाटते. हवामानबदलाचा विचार समोर आला की अनेकजण घाबरू लागतात. यालाच इको-एंक्झायटी असं म्हटलं जातं.

* सध्याच्या काळात स्मार्टफोनशिवाय जगणं अशक्य झालं आहे. प्रत्येकाला हातात स्मार्टफोन लागतो. स्मार्टफोनपासून दूर रहाणं अनेकांना सहन होत नाही. याला नोमोफोबिया असं म्हटलं जातं. यात फोन जवळ नसला की अस्वस्थता जाणवते. सतत मोबाईल फोनचा विचार करणं, फोन घरी विसरल्यावर आलेले मेसेज तसंच मिस्ड कॉलबद्दल विचार करत राहणं म्हणजे नोमोफोबिया. या फोबियाचं प्रमाण वाढत चाललं आहे.

* फूड निओफोबियाचं प्रमाणही वाढत चाललं आहे. या प्रकारच्या फोबियामध्ये एखादा नवा पदार्थ खाऊन बघण्याबाबत प्रचंड अस्वस्थता जाणवते. लहान मुलांमध्ये हा फोबिया आढळतो.

* सध्या फॅड डाएट्सचं प्रमाण वाढलंय. बारीक राहण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. कर्बोदकांच्या सेवनामुळे वजन वाढतं, असंही बोललं जातं. कर्बोदकांमुळे वजन वाढण्याची भीती कार्बोफोबियाला जन्म देते. म्हणूनच अनेकांना कर्बोदकं खाण्याची प्रचंड भीती वाटते.

* एडिटिओव्हल्टा फोबिया हे नाव सहसा कोणी ऐकलं नसेल. हे भलं मोठं नाव ऐकून कोणालाही धक्का बसेल. सोशल मीडियाची भीती म्हणजे एडिटिओव्हल्टा फोबिया. आपण सतत कोणाच्या तरी नजरेत आहोत, सोशल मीडियामुळे अनेकजण आपलं निरिक्षण करत असतील असे विचार यामुळे मनात येऊ लागतात. म्हणूनच सोशल मीडियापासून लांब रहायला हवं.

## ...म्हणून वाढतो ताण

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात ताणतणावांपासून कोणीही सुटत नाही. प्रचंड काम, प्रवास, घराची जबाबदारी यामुळे ताण वाढतोच. शिवाय आपल्या काही सवयींमुळेही ताणात भर पडते. कोणत्या आहेत या सवयी? जाणून घेऊ.



कुठे चुकतो आपण?

* काही लोक छोट्या छोट्या गोष्टींचा अतिविचार करतात. या अतिविचारामुळे ताणात भर पडते. अतिविचारावर नियंत्रण मिळवता येतं. मनात कोणत्याही चुकीच्या विचारांना थारा देऊ नका. वर्तमानात जगा. भूतकाळ तसंच भविष्याचा फार विचार करू नका.

* माणसाला शांत झोपेची गरज असते. पुरेशी झोप मिळाली की दिवस उत्साहात सुरू होतो. अपुऱ्या झोपेमुळे मात्र खूप चिडचिड होते. ताण वाढतो. त्यामुळे दररोज किमान सहा ते आठ तासांची झोप घ्यायला हवी.

* अव्यवस्थितपणामुळेही ताण वाढतो. घरात किंवा ऑफिस डेस्कवर खूप पसारा असेल तर ताणात भर पडते. हा ताण कमी करण्यासाठी प्रत्येक वस्तू जागेवर ठेवा. घर आवरून ठेवा. उगाचच पसारा करू नका.

* स्मार्टफोन हा सुद्धा ताणात भर घालणारा घटक आहे. त्यामुळे स्मार्टफोन, सोशल मीडिया यांचा वापर मर्यादितच करायला हवा. स्मार्टफोन वापरावर नियंत्रण आणा. गरज वाटल्यास नोटिफिकेशन्स बंद करा. झोपण्याआधी काही काळ स्मार्टफोन बाजूला ठेवा. यामुळे तुमचा ताण कमी व्हायला मदत होईल.

## किडनीविकार ओळखा



आरोग्यचर्चा

डॉ. अजय गर्जे

किडनीला शरीराचे फिल्टर मशीन म्हटले जाते. कारण किडनी रक्त स्वच्छ करते, शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते आणि पाणी-सोडियम संतुलन राखते. किडनीने काम करणे थांबवले तर शरीराला गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

किडनी निकामी होण्याआधी लक्षणे

किडनी खराब होण्याची सुरुवातीची लक्षणे

* सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे: किडनी रक्त योग्यरित्या स्वच्छ करू शकत नसेल, तर शरीरात टाकाऊ पदार्थ जमा होऊ लागतात, त्यामुळे शरीर सुस्त आणि कमकुवत वाटते.

* चेहरा, पाय आणि घोट्यांवर सूज येणे: मूत्रपिंड अतिरिक्त द्रव काढून टाकू शकत नाहीत तेव्हा ते शरीरात जमा होऊ लागते. यामुळे चेहऱ्यावर सूज येते, घोटे सुजतात आणि बूट घट्ट होतात.

* लघवीमध्ये बदल: रात्री वारंवार लघवी होणे, लघवीत रक्त येणे, जळजळ होणे किंवा दुर्गंधी येणे. ही सर्व लक्षणे किडनी व्यवस्थित काम करत नसल्याचे संकेत दर्शवतात.

* लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि चिडचिड: शरीरात विषारी पदार्थ वाढतात तेव्हा त्याचा मेंदूवरही परिणाम होतो. त्यामुळे निद्रानाश, मूड स्विंग, चिडचिडेपणा आणि लक्ष केंद्रित करण्यात अडचण येऊ शकते.

* मळमळ, उलट्या आणि भूक न लागणे: शरीरात विषारी घटक वाढतात तेव्हा ते पोटावर परिणाम करतात. परिणामी भूक लागत नाही, मळमळ किंवा उलट्या होतात. हळूहळू वजनदेखील कमी होऊ लागते.

**किडनी निरोगी ठेवण्यासाठी टिप्स**

* उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवा * भरपूर पाणी प्या (पण जास्त पाणी पिऊ नका) * धूम्रपान आणि मद्यपानापासून दूर रहा * डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक आणि अँटीबायोटिक्स घेऊ नका.

* दर ६-१२ महिन्यांनी आरोग्य तपासणी करा.

### नवसंशोधन

**धूम्रपानामुळे**



धूम्रपानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल आपण जाणतो. धूम्रपानामुळे शारीरिक आरोग्य धोक्यात येतच, शिवाय मानसिक आरोग्यावरही दुष्परिणाम होतात. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. धूम्रपान, नैराश्य आणि चिंता यांच्यातला परस्परसंबंध दाखवून देणारा शोध नुकताच प्रसिद्ध झाला आहे. म्हणजे धूम्रपानामुळे आपलं मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकतं. धूम्रपान करणारे लोक नैराश्याला बळी पडण्याची शक्यता दुपटीने अधिक असल्याचं या संशोधनातून समोर आलं आहे. यामुळे धूम्रपानाचं प्रमाण कमी करणं गरजेचं आहे.

### दंतारोग्य

**मुलांचे दात येताना**



दात येणं हा प्रत्येक बाळाच्या शारीरिक जडणघडणीतला महत्त्वाचा टप्पा मानला जातो. काही मुलं दात येण्याच्या प्रक्रियेतून सहज तरून जातात तर काही मुलांना खूप त्रास होतो. दात येण्याआधी काही मुलांच्या हिरड्या सुजतात. काहींना हिरड्यांमध्ये वेदना जाणवतात. यामुळे बाळ अस्वस्थ होतं. म्हणूनच या काळात मुलं रडतात, चिडचिड करतात. त्यांना भूक लागत नाही. काही मुलं झोपतही नाहीत. त्यामुळे या काळात मुलांची विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.

### जपणूक त्वचेची

**वय वाढल्याच्या खुणा...**



वय वाढल्याच्या खुणा त्वचेवर दिसू लागतात. खाद्यतेलापासून आहारातले विविध घटक त्वचेच्या आरोग्यावर परिणाम करतात. वय वाढल्याच्या खुणांमुळे त्वचा निस्तेज दिसू लागते. आपली त्वचा नैसर्गिक तजेला हरवून बसते. यामुळे हाडं आणि नसा दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी भरपूर पाणी प्या. ग्रीन टीमुळेही त्वचेला तजेला मिळू शकतो. पोषक आहार, फळांचं सेवनही उपयुक्त ठरू शकतं. चिया सीड्स तसंच अॅव्हाकॅडोमुळेही त्वचेला आवश्यक पोषण मिळतं.

### आजीबाईचा बटवा

**लाभदायी मखाणे**



मखाणे खूप आरोग्यदायी आहेत. त्याच्या नियमित सेवनामुळे विविध प्रकारच्या आजारांपासून मुक्ती मिळू शकते. मखाण्यांमध्ये फॅट्सचं प्रमाण बरंच कमी तर फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. सोडियमही बरंच कमी असतं. सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी मखाणे खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. मखाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही चांगले आहेत. यासोबतच बद्धकोष्ठता, निद्रानाश अशा विकारांवरही ते उपयुक्त ठरतात.

